# वऱ्हाडसमाचार.

पुतस्क १४ अकोला, सोमवार तारीख ५ माहे जुलै सन १८८० इसवी. अंक २६


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार-होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## नोटिसा

हिरालाल मथुरादास मारवाडी दुकान मौजे आडसुळ तालुके अकोट यास गोविंदा वल्लद इरभान गावंडे रहाणार तर्फ अंदुरें तालुके बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तर्फ अंदुरे एथील आमचें शेत पांढरीचें आह्मी तुह्मास २०० रुपयांस खरीदी लिहून दिलें. तेव्हां असा करार ठरला होता कीं, तुमची खातेबाकी तसि रुपये मजरे घेऊन बाकी रुपये दस्तैवज नोंदला गेल्यावर देऊं त्याप्रमाणें आह्मी दस्तैवज तुह्मास गेले अखेतिजीला नोंदून दिला व लागलीच तुह्मास आह्मी रुपये मागितले तेव्हां २५ रुपये रोख दिले व बाकीचे रुपये सर्व तुह्मी आज देतों उद्या देतों असें ह्मणून आजवर चाळविलें पण सदर्हू बद्दल रुपये अजून दिले नाहींत. ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्या पासून ४ दिवसांचे आंत आमचे १४५ रु तुह्माकडे निघतात ते द्यावे व आमची भरपाई घ्यावी त्या वाचून सदर्हू शेत तुमचे तांबेत येणार नाहीं कारण कीं सदर्हू शेत भवानीलाल लखूलाल अंदुरेकर यांजपाशी गहाण आहे व त्याचे रुपये देण्यासाठींच मी हें शेत तुह्मास विकले आहे सबब रुपये दिल्या वाचून शेतावर तुमची मालकी कोणतेही प्रकारें पोंचणार नाहीं व विश्वास देऊन अशा बेमानी वर येणेंही तुमच्या सारख्यांस योग्य नाहीं. वरील मुदतींत तुह्मी रुपये न दिल्यास विश्वासघाताबद्दल तुह्मावर फिर्याद करून रुपये वसूल केले जातील कळावें तारीख २६ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) गोविंदा वल्लद इरभान गावंडे
यांचे हातची निशाणी

### नोटिस.

चिमाई मर्द जानजी तेलीण रहाणार गायगाय तालुके बाळापुर यास सिताराम वल्लद उदेभान भाकरे पाटील मौजे मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुजकडे आमचें घेणें २५० रुपये त्याला दोन वर्षे झालीं गेले सालीं तूं व्याज दिलेस व या शिमग्यांत ४० रुपये दिलेस सर्व रुपये मागितले असतां देत नाहीस व पुरजाही करून देत नाहींस त्यास नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांत आमचे सर्व रुपये व्याजासुद्धां द्यावे किंवा पुरजा करून द्यावा. तसें न केल्यास तुजवर फिर्याद करून सर्व रकम भरून घेतली जाईल. वं या नोटिसीचा खर्चही तुला देणें लागेल. कळावें, तारीख २९ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) सिताराम वल्लद उदेभान पाटील
दस्तुर खुद्द.

### नोटिस.

सारजी मर्द उदेभान हरणे जात कुणबी रहाणार मौजे मोखेड परगणे नांदगाव (काजी ) तालुके चांदूर जिल्हें उमरावती इला खालीं सही करणार याजकडून नोटिसीचा जबाब देण्यांत येतो कीं तूं तारीख १४ माहे जून सन १८८० इसवीचे उमरावती एथील प्रमोदसिंधूंत मला नोटिस दिली तिचें उत्तर खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१ मी तुझा नवरा असून माझे घरीं तूं आजपावेतो नांदलीस आज सहा महिने झाले तुझा बाप तुला माहेरीं घेऊन गेला आणि तूं आपल्या आप्त वर्गाचे घरीं भेटण्यास जाते ह्मणून गेलीस.

२ मी तुला मौजे वाडेगाव प्रगणे मंगरूळपीर तालुके मजकूर जिल्हे वाशीम एथें आणावयास आलो असून तूं तेथें नव्हतीस.

३ ज्या वेळेस तूं माझे एथून गेलीस त्या वेळेस तुझे अंगावर माझे डागिने होते ते व इतर जिन्नस खालीं लिहिल्याप्रमाणें:—

रूपये
६० तोडे चांदीचे वजन तोळे ६०
१६ हातांतील कडें वजन तोळे १६
४० नथ सोन्याची तुऱ्याची.
१० पोलटें वजन तोळे १०.
१८ बुगड्या कानांतील वजन तोळा एक.
३० कोपरवाळ्या वजन तोळे तीस
२० हासळी वजन तोळे वीस.
१५ सांकळी चांदीची गळ्यांतली १५ तोळे
१२ जोडवी वजन तोळे बारा.
२५ किरकोळ. गळ्यांतील पोत सोन्याची
१०० बैल दोन
५० गाई दाने
२५० रोख रुपये घरून नेले.
२० वासरें दोन
५० पाटाव
२५ साडी जरीकाठी

एकून ७४१ रुपयांचा अजवाब माझा घेऊन कोणास न कळतां तुझा बाप व तूं निघून गेलां.

मी या मार्गेच तुजवर खटला करावा परंतु तूं लग्नाची बायको असल्याकारणानें मी तसाच वाट पहात आहे. तूं आजपावेतो येतां दिसत नाहींस व माझे गावापासून ४ कोसावर होतीस आणि एकदम तिकडे निघून गेलीस.

५ मध्यंतरीं तुझा बाप एथें आला असतां त्याला तुझ्याविषयीं विचारपूस केली व तुला पाठविण्याविषयीं ह्मटलें परंतु त्याणें कांहींच रुकार दिला नाहीं व तूं असें करशील असा मला भरवसा नव्हता. असो आतां जे झालें तें बरें झालें परंतु आतां तरी वर लिहिले आजबाबासुद्धां आज तारखेपासून १५ दिवसांचे आंत आलीस तर बरें आहे नाहीं तर तुजवर व तुझ्या बापावर फौजदारींत फिर्याद करीन व वारंटावर उभयतांस घेऊन येईन मग तुझें कांहीं चालणार नाहीं.

६ मी तुला नांदविण्यास कबूल आहे.

वर लिहिलेप्रमाणें तूं जर न आलीस तर तुजवर खटला केल्या खेरीज सोडणार नाहीं हें खूप समजावें. कळावें, तारीख २७ जून सन १८८० इसवी.

( सही ) उदेभान वल्लद भवानी हरणें
वस्ती कंझारे
निशाणी खुद्द हातची.

### नोटिस.

अनी मर्द सुऱ्या धनगर रहाणार नांदखेडे हल्लीं मुक्काम अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं मला तारीख १९ जून सन १८८० इसवी रोजीं नोटिस दिली ती पावली त्यांतील मजकूर मला सहा वर्षांपासून नांदवीत नाहींस व मला कर्ज तीनशें रुपये झालें आहे. हे देऊन नांदविणें असल्यास घेऊन जावें किंवा नांदविणें नसल्यास फारकती द्यावी. अगर दिवाणींत फिर्याद करून खर्चाचे रुपये भरून घेईन. त्यास आज बारा महिने झाले तूं दुसऱ्याच्या नादीं लागून त्याचे फंद फितुरीनें फिरत आहेस मी तुला कित्येक वेळां सांगितलें कीं, तूं दुसऱ्याच्या नादीं लागूं नको तूं आपल्या आतेच्या व वेड्याच्या नादीं लागून नोटिस दिली आहे ही अगदी गैर आहे. मी एक पैसाहि देणार नाहीं. कारण मी तर नांदविण्यास राजी असतां तूं असा फैल केलास. त्यास कांहीं हरकत नाहीं. हल्लीं तुझे अंगावर असलेले डागिन्यासह तूं माझे एथें यावें यांत चांगलें आहे. नाहीं तर तुजवर फिर्याद करून कायदेशीर रीतीनें तुला तांबेत घेईन. शिवाय तूं गेलीस ते वेळेस तुझ्या अंगावर डागिने सरी, दंडवाळे. नथ व पायांतील कडी मिळून सुमार ५० पन्नास रुपयांचें होतें तेही नेलेंस तें बरोबर आणावें या बद्दल दिवाणींत फिर्याद करून घेतले जाईल. तुझा पैसा एकही मी घेतला नाहीं हें खूप मनांत समजून तूं कोणाची गोष्ट न ऐकितां माझे घरीं यावें तूं माझे एथें आल्यास तुला अन्न वस्त्राची वगैरे कांहींच उणीव होणार नाहीं- ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत माझे एथें न आलीस तर तुजवर फिर्याद करून तुला तांबेत घेईन फारकती कधींही तुला देणार नाहीं. कळावें तारीख २९ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) सुऱ्या वल्लद ह्मसाजी धनगर
निशाणी खुद्द हातची
असे.

ताजा कलम — तूं आपले नोटिशींत मला जाऊन सहा वर्षे झालीं असें लिहिलें आहे हें अगदी खोटें आहे कारण सुमार १२ महिने झाले तुझ्या आतेच्या घरास आग लागली ते समयीं आग विझविण्याकरितां ह्मणून तूं गेलीस ती पुन्हा आली नाहींस. इतक्या काळांत तुला दोन वेळां मूळ पाठविलें असून तूं आली नाहींस यावरून तुझे मारठोक करण्यानें जाण्याचें जें कारण लिहिलें तेंही अगदी खोटें आहे हे तुला कळावें तारीख २९ माहे जून सन १८८० इसवी.

( सही ) सुऱ्या वल्लद ह्मसाजी धनगर
रहाणार नांदखेड ता. बाळापुर
निशाणी खुद्द.

### नोटिस.

भदेखा वल्लद महबूबखा रहाणार हिवरखेड तालुके अकोट यास भिवराज रामसुक वस्ती हिवरखेड तालुके अकोट याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे तुह्माकडे रुपये येणें असून त्यांत तुह्मी आपले नावचें हिवरखेड एथील शेत आह्मांस गहाण लिहून दिलें आहे. सदर्हू रुपये तुह्मी अजून आह्मांस आणून दिले नाहींत सबब सदरहू गहाण लिहून दिलेल्या शेतावर तुमचा कोणतेही प्रकारें हक्क नाहीं. ह्मणून तें शेत तुह्मी कोणास गहाण, खरीद किंवा भाडेपट्टीनें देऊ नये असें तुह्मास कळवित आहो. व या मुद्दाम नोटिसीनें असेंही कळवितो कीं, ही नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत आमचे सर्व रुपये व्याजासुद्धां देऊन तुह्मी आपलें शेत मोकळें करून घ्यावें. याशिवाय आमची खातेबाकीही तुह्माकडे आहे तिचीही आदाई करावी याप्रमाणें तुह्मी न केल्यास तुह्मावर फिर्याद करून रुपये वसूल केले जातील. व कोर्ट खर्च व या नोटिसीचा खर्च तुह्मावर बसेल. कळावें, तारीख १ माहे जुलै सन १८८० इसवी.

( सही ) भिवराज रामसुक रहाणार
हिवरखेड तालुके
अकोट दस्तुर
रामसुक.

वऱ्हाडसमाचार.

मिति ज्येष्ठ वद्य १३ शके १८०२

## आगगाड्यांसंबंधी गैरसोयी.

इतर वाहनांतून प्रवास करण्यापेक्षां आगगाड्यांतून प्रवास करणें सुखाचें व सोयीचें आहे. यामुळें देशांत जसजसा आगगाडीचा रस्ता वाढत गेला तसतसे लोक त्याचा उपयोग अधिकाधिक करून घेऊं लागले; पण हल्लीं लोकांचे निदर्शनास असें पक्कें येऊं लागलें आहे कीं आगगाडींत बसण्यापासून जितकें सुख आहे त्याच्या दसपट तिजवरील अव्यवस्थेपासून व कामदारांच्या उर्मठपणापासून लोकांस दुःख आहे. पण आमच्या इकडील अडाणी लोकांची समजूत अशी कीं रेल्वे सरकारी आहे व सरकारी माणसांनीं कांहीं केलें तरी त्यांचे हातीं सत्ता आहे तेव्हां लोकांच्या दुःखाची दाद कशानें लागणार ?

गेल्या आठवड्याचे मुंबईचे नेटिव ओपिनियन पत्रांत रेल्वे कंपनीच्या अंदाधुंदीबद्दल व तिजपासून लोकांस जो अतोनात त्रास होतो त्याजबद्दल मोठें चित्तवेधक वर्णन लिहिलें आहे तें सर्वांनीं अवश्य वाचून पहावें. व आपले दुःखाचा सरकारांत बोभाट न्यावा आह्मी खात्रीनें सांगतो कीं तें सर्व खरें आहे इतकेंच नव्हे त्याहून अधिक जाच आणखी कित्येक स्टेशनांवर होत असतो. नेटिवओपिनियनमध्यें लिहिलेले पुण्याच्या स्टेशनावरील लोकांस होणारे त्रास जो जो वाचून पाहील तो तो ह्मणेल कीं जळो हा आगगाडीचा प्रवास! व धिक्कार असो या रेल्वे कंपनीच्या व्यवस्थेस ! इलाज नाहीं ह्मणून प्रवास केला पाहिजे, व पदरीं गरिबी ह्मणून तिसरे चवथे क्लासचे टिकिटानीं गेलें पाहिजे. बाकी हा त्रास टाळण्याची सोय असती तर लोक मोठ्या खुशीनें तो टाळते.

उन्हाळ्यांत आमचे बहुत मित्र देशीं जाऊन नुकतेच आगगाडीचा सुखसोहळा भोगून परत आलेले आहेत त्यांतून कित्येकांनां कित्येक ठिकाणीं आगगाड्यांच्या योगानें जे परोपरीचे क्लेश झालेले त्यांनीं सांगितले ते सविस्तर लिहिले तर खरोखर एक मोठा ग्रंथ होईल. पण तसा करणार कोण? व त्यापासून होणार काय! असो, गोष्ट ओघास आली ह्मणून आह्मी कांहीं प्रकार आपले वाचकांस कळवितों.

तिसरे व चवथे क्लासचे उतारकरू आतांशा फार असतात व त्यांस पुरेशा गाड्या असाव्या तितक्या ट्रेनला जोडीत नाहींत ह्मणून लोकांस फार दुःख होतें. पूर्वींचे गच्च भरून आलेले डबे त्यांतच नवीन उतारकरू दहा दहा पंध्रा पंध्रा आणखी कोंबून भरतात. कधीं कधीं उभे राहूनही पाय ठेवावयास कांहीं मैल गाडींत जागा नसते. व उभें असणारांचें असें दुःख पाहातात तरी कांहीं दयाळू लोक बाकावरून आडवे पडलेले असतात व लोकांचे हाल मौजेनें पहात असतात. कोणे स्टेशनावर फार ओरड झाली व पोलिसाची तब्बेत लागली तर तो येऊन त्या लोकांस उठवितो व मग कांहीं लोकांस थोडी जागा होते. या हालानें असे तसे भुसावळेस जाऊन उतरावें तों तेथें दोन तीनशें लोकांची दाटी! टिकिट काढावयाचीं असलीं व बायका मनुष्यें बरोबर असलीं तर महान संकट! बायका मुलांस प्लयाटफार्मवर दूर देखील उभे राहूं देत नाहींत, मग निर्वेध बसण्याची गोष्ट कशास पाहिजे ? कोंडवाड्यांत बसून कैदी सारखे कठड्यांतून एकेक जाऊन देवासारखे टिकिट मास्तरेंच आर्जव करून व त्याचा उर्मटपणा सर्व सहन करून टिकिटें घ्यावीं व घामाघूम होऊन पहिल्याच अदबीनें गाडीशीं यावें. व बायका मनुष्यास तोबा चालला असतां त्यांतून नेऊन कोंडमाऱ्याचें कसें तरी एकदा बसवावें व आपण येऊन बसावें ह्मणजे अटकेंत घोडे नहाले! भुसावळचें मोठें स्टेशन, सकाळचा वेळ, गाडी बरीच थांबते परंतु वर लिहिलेला सोमयाग करतां करतां लघवीस जाण्याची देखील फुरसत किंवा सोय नाहीं, मग बहिर्दिशेची व मुखमार्जनाची गोष्ट कशास पाहिजे? लोकल गाडीला लघुशंकेच्या वगैरे सोयी मुळीं नाहींत. कारण मेल गाडीचें पुण्य या लोकांनीं खर्चीं घातलें नाहीं ह्मणून. अस्तु. पुढें चालू व्हावें तों मध्यंतरीं लागणारीं स्टेशनें त्यांवरून भूतदयेचा झपाटा फार त्यामुळें ओळखीच्या शिवाय किंवा क्वचित पांढरपेशाशिवाय कोणाची, गाडीखालीं उतरून, लघवीस जाण्याची प्राज्ञा नाहीं. बरें, ठीक आहे. पुढें आमचे कांहीं मित्र भर उन्हाळ्यांत बारावर एक वाजण्याचे सुमारास मनमाडास उतरले तेव्हांचा त्या लोकांचा तेथील हवाल काय सांगावा? या स्टेशनावर उतरतांच टिकीट आफिसांतून उतार करून जाऊं देण्याची पहिली वहिवाट होती ती बंद करून सुमार पाव मैल लांबीचा नवा रस्ता केला आहे. व त्यावर यथेच्छ वाळू पसरली आहे. त्यावरून उन्हाळ्यांत प्रखर सूर्याचे किरणांत दिवसां एक वाजतां अनवाहणी स्त्रियांनीं व मुलांनीं जाण्याची योजना रेलवे कंपनीनें केली आहे! शाबास या रेल्वे कंपनीची! व हिच्या व्यवस्थापकांची धन्य आहे! स्त्रियांनीं त्या तापलेल्या वाळूवरून चालू लागावें तों पायांस चटका बसावा इतक्यांत लहान मुलांचे कोमल पाय होरपळून त्यांनीं रडूं लागून आयांच्याकडे वर बसावयास यावें तेव्हां त्या बिच्याऱ्यांनां त्यांचे पाय नकोसे झालेले, शिवाय बोचकीं डोक्यावर आणि मुलें कडेवर घेऊन लाह्या भाजल्यासारखी पायांची अवस्था होत असतां त्यांनीं तसेंच चालू लागावें. पण त्या आगीच्या खाईंत चालवतें कसें? शेवटी कोणी पायास फडकीं बांधून व कोणी पुरुषांचे जोडे घालून मोठ्या प्रयासानें एकदाच्या घरीं गेल्या. अहाहा! रेल्वे कंपनीनें ही लोकांची केवढी उत्तम सोय केली आहे! शाबास!

स्टेशनावरून कोठें खाण्याचा जिन्नस मिळावयाचा नाहीं. खाण्याचा जिन्नस असो, उन्हाळ्यांत पाणी देखील कित्येक स्टेशनांवरून मिळत नाहीं. जिन्नस विकावयास घेऊन येणारापासून रेल्वे कंपनी पैसे घेते तेव्हां त्यांनां पास देते. नगर लायनीवर एक दोन स्टेशनांवरून, गवळी लोक दूध व खवा घेऊन हिंडत होते त्यांस विच्यारितां त्यांनीं सांगितलें कीं, दर विकणारापासून दहा दहा रुपये कंपनीनें घेऊन पास दिलेले आहेत. हे दहा रुपये महिन्याचे किंवा वर्षाचे तें समजलें नाहीं. तेव्हां असा जबर कर देऊन कोण उदमी जिन्नस घेऊन येणार? व तो कशानें उतारकरूंच्या मुखांत पडणार? त्यांनां शिवरात्र किंवा एकादशी समजून मजल करावी लागते. घरीं असतांनां मुखमार्जन, स्नान, मोकळें हिंडणें हें तरी घडतें, आगगाडींत हें सर्व बंद असून देहधर्माचाही अवरोध होऊन कुलपांत बसावें लागते. तेव्हां एकादशी व शिवरात्र यांहून हें पुण्य अधिक समजावयाचें !

उतारकरूचे बोचकें वजन करून त्यापासून अधिक पैसे घेण्याचाही जागोजाग पुष्कळ त्रास आहे. त्यांत किती लबाड्या होत असतील, व कंपनीचे घरांत सर्व पैसे कसे जात असतील याविषयीं पुष्कळांस संशय आहे. गरीब कुणब्याचें शेर अच्छेर ओझें अधिक भरल्यास व त्या बिचाऱ्याजवळ त्याजबद्दल पैसे द्यावयास नसल्यास त्याचे फार हाल होतात, रुपया आठआण्याचा जिन्नस आण्याअर्धआण्यावारी त्याला तो स्टेशनावर विकावा लागतो, नाहीं पेक्षां कैदेंत जाऊन मुकदमा करून घ्यावा लागतो. पण हाच सरसाम नियम नाहीं. धष्टपुष्ट पुरभय्ये वगैरे लोक पांच शेरांचे बदला वीसवीस शेरही ओझें पसार करितात त्यांस कोणी कांहीं बोलत नाहीं असे अनेक प्रकार आहेत.

सरकारास आमची विनंती अशी आहे कीं रयतेस सुख देण्याकरितां त्यांनीं या कामीं अवश्य लक्ष्य पुरवावें. त्याशिवाय ही अंदाधुंदी व त्रास कमी व्हावयाचा नाहीं. गाड्यामध्यें मनुष्यें फार कोंबून भरूं नयेत, अधिक उतारू असल्यास अधिक गाड्या जोडीत जाव्या. भुसावळ, पुणें, कल्याण वगैरे ठिकाणीं सावकाशपणें, टिकिटें मिळावयाची व व्यवस्थितपणानें लोकांस बसविण्याची काळजी ठेवावी. बायकांचे डब्यांशीं पुरुष त्यांतून युरोपियन बचडे जाऊन त्यांनां लवकर उतरविण्याची व घाईनें बसविण्याची आणि टिकिटें मागण्याची धांदल करण्याचा जो प्रकार आहे तो दुरुस्त झाला पाहिजे. स्त्रिया पदरीं टिकिटें बांधतात किंवा बोचक्यांत ठेवतात तीं काढण्यास त्यांनां वेळ लागतो, उतरण्याचे स्टेशनाविषयीं त्यांनां ज्ञान नसतें, शिवाय पोराबाळांचें लटांबळ त्यांच्या बरोबर असतें ह्मणून परकी गृहस्थानें त्यांस फार घाई करावी, अपशब्द बोलावे किंवा त्यांच्या हातचें बोचकें ओढावें हें अगदीं अयोग्य आहे. त्यापेक्षां स्त्रियांच्या गाड्या जशा निराळ्या केल्या आहेत तशा त्यांनां बसविण्याचे व उतरविण्याचे कामाकरितां स्त्रियाच नोकर ठेविल्यास फार चांगलें होईल.

या गैरसोयी व हे त्रास जी. आय. पी. रेल्वेवरच फार आहेत. बडोदा रेल्वेकडे असा बोभाटा नाहीं ह्मणून नेटिवओपिनियन पत्रांत लिहिलें आहे. तसें असेल तर फार चांगलें. व त्या कंपनीचें उदाहरण जी. आय. पीनें अवश्य घ्यावें व ती न घेईल तर सरकारानें तिला घेण्यास लावावें. उतारकरूंच्या गाड्याविषयीं वरील सर्व प्रकार झाला. माल गाड्यांविषयींही असाच लोकांचा बोभाट आहे. दर फार पडतो, माल लवकर पोंचत नाहीं, अफरातफर होते वगैरे कारणामुळें कित्येक ठिकाणीं लोकांनीं बैलगाडीनें माल पाठविण्याची सुरवात केली आहे व ही गोष्ट रेल्वे कंपनीला फार लाजिरवाणी आहे. मुंबईहून घाटावर बैलांच्या योगानें पुष्कळ माल जाऊं लागला आहे असें टाइम्सपत्रांत लिहिलें आहे. व मनमाडाहून इंदुराकडे बहुत माल बैलगाड्यांनीं जात असल्याचें आह्मी पाहिलें आहे. साल मजकुरच्या जानेवारी तागाईत मे अखेर पाचमाही उत्पन्नांत जी. आय. पी. कंपनीस गुदस्तच्या पांच महिन्यापेक्षां १७ लक्ष रुपयांची कमी पैदास झाली असें हें कळतें. तर कंपनीनें ही गोष्ट लक्ष्यांत ठेवून लवकर सर्व प्रकारचा बंदोबस्त करणें फार अवश्य आहे असें आह्मांस वाटतें.

---

Moulvie Abdul Latif Khan Bahadoor has been raised to the dignity of a Nawab; a fit recognition of his untiring efforts to dispel the prejudices of his coreligionists and promote among them a taste for English education. The Mohomedan Literary Society is believed to have sprung up owing to him. The ceremony of investiture took place at Alipure at a Durbar held by Mr. Munro the commisioner of the Presidency Division. The 'Sunud' was presented to him in the following terms. "The Government of India having decided, to confer upon the Moulvie the title of Nawab, the duty had fallen upon him to invest him (the Moulvie ) with it. The honor was being conferred, Mr. munro said, for the services which the Moulvie had rendered on many occasions, and which had called forth the approbation and approval of the Government, and the esteem and regard in which he was held by the official and non official classes in the district in which those services has been rendered. It was needless, therefore, for Mr. Munro to recapitulate those services, which were well known. He had therefore much pleasure in handing him the sunnud conferring on him the title of Nawab. The Sunnud, which was couched in the usual form was here read and handed to Nawab Abdool Luteef, Khan Bahadoor."

---

Coriolanus in the "London gossip" writes "A senseless agitation is being got up by Protestants and missionaries here against the appointment of your new Viceroy. Knowing that I write for you, I was addressed last Friday by one of the wire-pullers of these unwise people and asked to take the matter np. My answer was that the principles upon which the Government of Her Majesty's Indian Empire was based were those of strict religious neutrality, and as it had been proclaimed that

..o subject of Her Majesty in India should be debarred by his religious opinions from holding any office under the crown, if it was Her Mejesty's pleasure to appoint a Hindoo or Mahomeden to represent her as a good constitutionalist. I would support him in the discharge of his duty."

The possibility of a Hindoo or Mahomedan as a viceroy is far too remote, but we venture to ask if the day will ever come when the British constitution will take such a step.

---

On the 15th June a letter was sent to Abdul Rahman stating the terms on which he might be made Ameer of Afghanistan and his reply is expected soon. Ayoob Khan and Yakoob Khan are two more likely candidates in the event of negotiations with Abdul Rahman failing. It is unknown at present in what capacity Abdul Rahman advances, whether that of friend or foe, but there is a rumour current that notwithstanding the hitherto antagonistic claims, Abdul Rahiman, Mahomed Jan, Muskialam and Meer Butchahave resolved to sink their differences and to make common cause with their enemy and by every means in their 'power to expel the invaders of their Country.

---

One of our Indian contemporaries had it that Mr. Lall Mohan ghose had been asked to stand for one of the Irish Home Rule seats which Mr. Parnell shall vacate in consequence of his being elected for three places. We now learn that he is shortly expected in India. He has not evidently found a constituency lief to accept him as a candidae for parliament.

---

Colonel Sir R. Meade K. C. S. I.; C. I. E; Resident of Hyderabad obtained an extension of 15 days privilege leave. (The leave expiring on the 26th June. Mr. Jones our enrgetic and talented Commissioner has come back among us. On dit that in the event of Mr. A. C. Lyall the secretary to the Government of India in the foreign Department leaving for Europe in August he will be succeeded by our worthy Commissioner Mr. W. B. Jones B. L.

---

(FROM OUR OWN CORRESPONDET.)

AMRAOTI 1st July.

The rains have really set in here. For the past week we have not seen the sun and still it is all damp and drtzzle, a not very pleasant state of things, but still in Amraoti somewhat bearable. Our hard soil, our elevated location, and our excellent roads, all tend to make us happier during a monsoon season than you can be down in Akola. The moment the rain ceases here, a walk or a drive is really enjoyable. At Akola it takes two bright sunny days to take away the outside discomfarts of one wet day. As for your Akola roads, I mean the station ones, the less said about them and the state in which they were last rainy season, the better.

When the Pioneer oracularly speculated on Mr. Bernard going to British Burmah, a certain amount of speculation. not oracular but local, was started as to the subsidiary changes that would thereafter take place, and it was surmised by shrewd persons and sharp ones that Mr. Jones would probably follow Mr. Bernard in succession to the Home Secretariat, as some time ago he Succeeded him in the use of those two now historical pieces of furniture, the chair and the 'table of the Central Provinces Secretariat: Subsequent facts however, prove that Mr. Jones cannot be spared from Berar just yet, and it is well, very well for Berar, that such should have been ordained by the powers "Spirituals and temporal.'

Mr. Charles Grant of Central Provinces Gazeteer fame, has found a reward for his labors, administrative and literary, in being transferred to an office from which further advancement is a matter of course and generally of very short interval.

Amraoti will contribute a number of candidates to the coming standard Examinations and these it is to be hoped will more successfuly grapple with the test than the Majority of last years candidates did. The examination last September was a terible ordeal for two things One the sticklish nature of the questions, the other the heavy per-centages of marks required to pass and weren't these last given sparingly according to the general cry of the defeathered ones?

Mr. Jones comes back tomorrow, and Colonel Bell comes in with him to make over charge. Major Farrer comes in according to expectation, some time this month, and according to rumour he is to assume either the office of Inspector General of Police &c, or that of Deputy Comissioner of Amraoti.

---

## वऱ्हाड.

मे० जोन्स साहेब हैदराबादेहून उमरावतीस आपले कमिशनरचे जागेवर रुजू होण्याकरितां पहिले तारखेस येऊन दाखल झाले.

---

कर्नल बेल साहेब व कर्नल बुशबी साहेब उमरावतीस मे. जोन्स साहेब यांचे भेटीकरितां दुसरे तारखेस एथून गेले. होते ते तिसरे तारखेस परत आले. व कर्नल बुशबी साहेब काल बुलढाण्या कडे डिपुटी कमिशनरचे जागेवर गेले.

---

मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी, आय. ई. पहिले तारखेस एथें येऊन आपले कामावर रुजू झाले.

---

रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान एथील डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर बुधवारीं एथें आले. व गुरुवारीं त्यांची रजा संपून शुक्रवारीं ते आपले कामावर रुजू झाले.

---

बुलढाण्यास सेशनाकारितां जुडिशियल कमिशनर साहेब गेले होते व एक मुकद्दमा तेथें होता पण तो चालविण्याजोगा नाहीं असें रा. रा. देवराव विनायक गव्हरमेंट प्रासिक्युटर यानीं कळविल्यावरून तो न चालवितां सोडून दिला व साहेबांची स्वारी परत आली

---

रा. रा. आत्माराम भिकाजी इलिचपूरचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांनीं कर्नल बुशबी साहेब व कर्नल बेल साहेब यांस चिखलदऱ्याहून ते परत आल्या वेळीं मेजवानी दिली. आणखी ही कित्येक युरोपियन लोक होते व बेत फार चांगला केला होता.

---

पर्जन्याची गेल्या आठवड्यांत पडती भावना झाली पण लोकांची काळजी कालपर्यंत निवारण झाली नव्हती. या सगळ्या आठवड्यांत ह्मणण्यासारखा पाऊस एक दिवस पडला व तो १०।१५ मिनिटेंच होता तेवढ्यानें पेरण्याचा कार्यभाग झाला नव्हता. कोरड्या शेतांतून कपाशीच्या पेरणीची सुरवात झाली होती. व बहुत लोक पेरणीकरितां पावसाची वाट पहात होते. चांगला सडकून पाऊस तास दोन तास पडल्यावाचून जमीनीस ओलावा येणार नाहीं, याजकरितां ईश्वरानें कृपाकरून लवकर चांगला पाऊस पाडावा अशी सर्व इच्छा करून होते तों काल सगळ्या दिवसांत वेळो वेळां पांच चार सरी चांगल्या येऊन लोकांची काळजी निवारण झाली.

---

वाशिमाहून २९ वे तारखेचें आह्मांस पत्र आलें आहे त्यांत लिहिलें आहे कीं हवेंत गारठा असून आकाश अभ्राच्छादित असतें व रात्रीस पाऊस पडत असतो आणि धान्य दिवसेंदिवस महाग होत चाललें आहे.

तेथें प्रति रविवारीं सभा होत असावी असें पत्र पाठविणारास वाटतें व हेडमास्तर, तहशिल्दार, क्लार्क यानीं ही गोष्ट मनावर ध्यावी असें तो इच्छितो.

---

उमरावतीकडे व इलिचपुराकडे पर्जन्य फार चांगला पडला असें तिकडील पत्रावरून समजतें.

---

इलिचपुरास डिपुटी क्लार्क आफ कोर्टचे जागीं मागें लिहिल्याप्रमाणें रा. रा. दामोदर नानाजी यांस नेमून त्यांचे ५० रुपयांचे जागेवर रा. रा. प्रभाकर सखाराम जयवंत ४० रुपयांचे कारकून यांस नेमिलें.

---

अकोल्यास डिपुटी क्लार्क आफ कोर्टची जागा रिकामी झाली तिजवर रा. रा. पराशराम गणेश यांस नेमून खालील जागा वर्गावर्गीनें भरल्या.

---

बाळापुरकर रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी० ए० हे कामाची माहिती करून घेण्यासाठीं एथें डिपुटी कमिशनर आफिसात जात असतात. हे हुशार आहेत व वरिष्ठ अधिकारी यांस लवकरच चांगली जागा सवड होईल तशी देतलि अशी आह्मास उमेद आहे.

---

बोरगावचे गोसाव्याचे दुकानाचा वाद पडून त्याची वहिवाट सरकारमार्फत एथील नाजर मि० शापुरजी यांजकडे एक वर्षभर होती तितके दिवसांत त्यांनीं काम फार चांगलें केल्यावरून मालकानीं त्यांच्या मेहनतीस व योग्यतेस शोभे अशी आणखी रकम त्यांस देण्या विषयींचा आपला हेतु डिपुटी कमिशनर साहेब यांस दर्शविला., व त्यांनीं त्यांस तसें करण्याविषयीं परवानगी दिली हा मजकूर मागील अंकांत आह्मी लिहिला आहे. त्याविषयीं आह्मांस खुलासा समजला आहे कीं मि० शापुरजी यांनीं सदर्हू दुकानचा कारभार पाहूं लागल्यापासूनें ३०००० रुपयांचा फायदा केला. वर्षेंच्यावर्षें कुळांच्या रुजुवाती नव्हत्या व कोणी मागणें केलें नव्हतें ह्या विषयींची त्यांनीं तजवीज लाविली. दुकानाकडे शेती बरीच असून तिचा कांहीं पत्ता नव्हता. त्याविषयीं गावोगाव स्वतां हिंडून माहितगार लोकांच्या सहायानें सर्व नंबराचा मेळ लाविला व सरकारी कागदाबरहुकूम सुरेख रीतीनें नवीनें कागद तयार केले. कुळाकडील रकमा वसूल केल्या त्यांत कोणास कांहीं नाराज न करितां व व्याजांत वगैरे ज्यांनीं जशी सूट मागीतली तशी देऊन खरोखर साहू लोकांचे रीतिप्रमाणें चोख व्यवहार केला. हें ऐकून आह्मांस संतोष वाटतो. मि. शापूरजी अशा कामांतही इतके प्रवीण असतील अशी आमची कल्पना नव्हती पण त्यानीं सदरीं लिहिल्या प्रमाणें उत्तम अनुभव दाखविला ह्मणून त्यांविषयीं अह्मी मित्रभावानें अभिमान बाळगतों. आमचे चाणाक्ष डिपुटी कमिशनर मे. फिटझरल्ड साहेब यानींही त्यांस ही रकम घेण्याविषयीं परवानगी देतांनां त्यांची मेहनत कबूल करून चांगली तारीफ केली व यांचें हें प्रामाणिकपणाचें इतर लोकांस उदाहरण व्हावें याकरितां अह्मी या गोष्टीस आपली मान्यता देतों असें त्यांनीं त्या प्रकरणांत लिहून ठेविल्याचें आह्मी ऐकिलें आहे व तें त्यांनीं फार चांगलें केलें असें आमचें मत आहे.

---

खामगाव तालुक्यांतील घारुळ एथें गेले आठवड्यांत एका मारवाड्याच्या घरावर सुमारे १५।१६ हत्यारबंद लोकांनीं डाका घातला. ते लोक मे. गनथार्प साहेब पोलिस सुपरिंटेंडेंट यानीं मोठ्या सितार्फीनें पकडले असें समजतें.

---

## वर्तमानसार.

इचलकरंजीकर नाटकवाले बडोद्याकडून मुंबईस जाऊन २ खेळ करून देशीं गेले. त्यांनां बडोद्यास चांगुलपणाबद्दल सर्टिफिकिटें मिळालेलीं नेटिवओपिनियन पत्रांत छापलीं होतीं व त्यांत कांहीं अर्थ नाहीं तीं भाडभिडेचीं होत असें पुणेंवैभवानें छापिलें आहे. हें एक व दुसरें एक सांगलीकरांचें नाटक बडोद्यांत होतें. आणि या नाटकाच्या संसर्गानें कित्येकें गरिबांचे संसार धुळीस मिळाले असा बोभाट आहे. सांगलीकर यज्ञेश्वर दीक्षित पुण्यास गेले आहेत त्यांचा तेथें कांहीं रंग नाहीं. इकडून नावाजून गेलेले फुकट श्रीमान, पोकळ डौली व फजीतखोर नानाभाई धैर्यवान खांडव्याकडे आहेत. येथें लोकांस त्यांनीं बुडविल्याबद्दल नोटिसा झाल्या आहेत व फिर्यादी झाल्या आहेत. कोल्हापुरकर नरहरबुवा मुंबईस गेले आहेत. त्यांचा लत्ता कपडा चांगला नाहीं पण खेळ वाईट नाहींत असें ह्मणतात. बडोद्याकडून सांगलीचें दुसरें नाटकही पुण्यास आलें. याप्रमाणें बाहेर गावीं नाटकांची स्थिति आहे.

खानदेशांत लायसेन्स ट्याक्स २२००० लोकांवर बसणार होता, पण शेवटीं ३००० लोकांवर बसला.

सर रिचर्ड टेंपल साहेब लोकांस ख्रिस्ती धर्माचा उपदेश करण्याकरितां लवकरच हिंदुस्थानांत येणार आहेत असें अरुणोदयांत लिहिलें आहे.

गुजराथेंत धोळका एथील म्युनिसिप्यालिटींत नवीन कर बसविण्याचा विचार निघाला तेव्हां ग्रामस्थ मेंबर ८ यानीं ह्मटलें कीं रयत गरीब आहे तिजवर, नवा कर बसवूं नये. असें असतां बाकीचे २ मेंबर व सरकारी ५ मेंबर व व्हाइस प्रेसिडेंट मि. क्राफर्ड साहेब यानीं संमती देऊन कर बसविण्याचा ठराव केला यावरून सदरील ८ मेंबरांनीं राजीनामे दिले व ती गोष्ट मुंबई सरकारास कळविली.

या वर्षी गोमांतकांत आंबे फार स्वस्त झाले आहेत. ८ आणे शेकडा असें ह्मणतात.

नाशिकचे सबार्डिनेट जडज व आणखी कांहीं लोक यांवर मुंबईचे पोर्तुगाल सरकारचे वकील यानीं अब्रू घेतल्याबद्दल माजिस्त्रेटकडे फिर्याद केली आहे असें अरुणोदयांत लिहिलें आहे.

फिनानशियल मिनिस्टर सर जान स्ट्रेची यानीं राजीनामा दिला.

श्रीमंत मल्हारराव गायकवाड मद्रासेस आहेत त्यांचा मुलगा मरण पावला त्याचें प्रत डा० सिवर्ड साहेब यांनीं म्युनिसिप्यालिटीच्या परवानगी शिवाय मल्हाररावांच्या रहात्या वाड्यांत पुरविलें त्याबद्दल फिर्याद होऊन डाक्टर यास १०० रुपये दंड झाला.

रविवारीं कोणीही कसलें सरकारी काम करूं नये असा नवीन व्हाइसराय साहेबांनीं हुकूम फरमाविला आहे.

विद्येच्या व्यासंगानें मनुष्याचें डोकें मोठें होत जातें. व मूर्खाचें डोकें लहान असतें असा एका डाक्टरांनीं शोध काढिला आहे.

चीन सरकारची फौज ६ लक्ष आहे. कांहीं तिरकमट्याचे व कांहीं बंदुकांचे शिपाई आहेत. त्यांच्या कांहीं बंदुका एवढाल्या मोठ्या आहेत कीं, एकेका बंदुकीस दोन दोन शिपाई लागतात. चीनच्या राजवाड्याच्या संरक्षणार्थ १७००० लोक आहेत.

✓जबलपुराकडे आगगाडींत पारशी स्त्री बसली असतां एक युरोपियन जबरी करून तिच्या गाडींत गेला. पुढें न्यायाधिशाकडे साक्षी न मिळाल्यावरून त्या अपराध्याचें कांहीं झालें नाहीं.

मि. रामचंद्र गोविंद ओक यांस जमखंडी संस्थानांत ३०० रुपयांची जागा मिळाली. हे गदग रेल्वे कडे असिस्टंट इंजिनियर असतां यांवर कांहीं टपका आला होता.

दक्षिण महाराष्ट्र देशांत मनोळी गावीं असिष्टंट कलेक्टर देवळांत शिरल्यानें देऊळ भ्रष्ट झालें त्याबद्दल मालकानें साहेबावर दिवाणींत दावा केला होता व त्याचा निकाल झाला. गेल्या दशमीस त्या देवालयांत ब्राह्मण भोजन होणार होतें.

मुंबई शहरांत रस्त्यावरून पाणी शिंपतात त्या कामीं कांहीं यंत्राची योजना करण्याचा विचार चालू आहे.

नवीन गवरनर सर जेम्स फर्ग्युसन साहेब सरकारी काम काज करण्याकरितां दररोज १२ वाजल्यापासून ५ वाजतपर्यंत कौन्सिल हालांत जाऊन बसत असतात. नामदार साहेबास काम काज करण्याची हौस बरीच आहे.

मुंबईस नळाच्या पाण्याची फार पंचाईत झाली आहे. धार बारीक सोडतात. तेणें करून एक घागर भरावयास १०।१५ मिनिटें लागतात. विहिरीचे पाण्यावर निर्वाह करण्याची पाळी आली आहे. पण कित्येकांनीं विहिरी बुजवून ठेविल्या आहेत त्यांस फार त्रास होतो.

सांगली इलाख्यांतील मामलेदार रा. रा. बाळाजी नारायण कोलटकर यानीं राजीनामा दिला व त्यांजवर कांहीं मुकदमे आहेत त्यांकरितां त्यांनीं कोलापुरास पोलिटिकल एजंटकडे अर्ज केला आहे कीं सांगली संस्थानाबाहेरच्या न्यायाधिशाकडे आपली चौकशी सोपवावी. एजंटानीं कागद मागविले आहेत.

इंदुरास होळकर सरकारचे पौत्रोत्साहाबद्दल देणग्या, धर्म, व उत्साह झपाट्यानें चालू आहे.

मुंबई सरकारानें रा. रा. चिंतो केशव यांस शिंदे सरकारच्या वतीनें मुंबई इलाख्यांत मुकदमे चालू करण्याकरितां व जबाब देण्याकरितां दरबारचे वकील नेमिलें.

गोव्यापासून हुबळीपर्यंत रेल्वे करण्याचा गोवे सरकारचा ठराव झाला व पोर्तुगाल देशच्या पार्लमेंट सभेची त्याला मंजुरात मिळाली.

काश्मिरास राजवाड्यांत विजेचे दिवे लावण्याचा समारंभ झाला. महाराजांनीं दिवे पेटविण्याची किल्ली आपल्या हातांनीं फिरविली.

मद्रास इलाख्यांत पहिल्या तारखेपासून अफूचा कायदा चालू झाला.

ट्रामवेचे रेल व त्या खालील स्लीपर कांचेचे केले असतां चांगले टिकतात व त्यास खर्च कमी लागतो असा लंडन शहरांत शोध करून पाहिला.

महाडाकडे येका विधवा बाईनें आपल्या दोन मुलींचीं तीनतीनशें रुपये घेऊन लग्नें केलीं. पुढें एक मुलगीचा पूर्व सासरा आला त्यानें ती विधवा आहे असें सांगितलें व एकीचा पाहिला नवराच आला व तो आपली बायको घेऊन गेला, नवे नवरे दोघे ही रडत बसले.

मागच्या आठवड्यांत मुंबईस खूप पाऊस पडला. सोमवार पर्यंत २५ इंच झाला.

अफू ओढण्याच्या बंदीबद्दल चीनसरकारानें सक्तीचा हुकूम केला आहे.

रा. रा. नारायण वासुदेव ऊर्फ बाळासाहेब खारकर नवा नगरचे दिवाण यांचें व जामसाहेबांचें पटेना सबब त्यांनीं राजीनामा दिला. जाम साहेबानीं सर्व दक्षिणी लोकें काढून टाकिले. पण रा. रा. रावजी भाजेकर यांस ठेविलें आहे. त्यांनां दिवाण व्हा ह्मणत होते परंतु ते झाले नाहीत. बाळा साहेब यांस ग्वालेर कडील बोलावणें आहे.

आजपर्यंत श्री० तात्यासाहेब सांगलीकर व त्यांचे कारभारी रावबहादूर नारायण गणेश देशपांडे यांजमध्यें बरेंच वैमनस्य पडलें होतें हें बहुतेक लोकांस माहीत असेलच. त्या प्रकरणाचा अखेर निकाल होणें करितां श्री. तात्यासाहेब यांची स्वारी थोडे दिवसां खालीं सर्व लवाजम्यानिशी करवीरास आल्याचें आह्मी त्याच वेळीं लिहिलें होतें. त्या कामाची पुष्कळ बाटाघाट होऊन मे. पोलिटिकल एजंट साहेब बहादूर व श्री. पंतप्रतिनिधी साहेब संस्थान औंध यांची स्वारी देवीचे दर्शनाकरितां त्याच संधीस करवीरास आली तेव्हां त्यांचे व साहेब बहादुरांचे विचारें असा ठराव झाला कीं, श्री. तात्यासाहेबांनीं मे. वालर साहेब यांचे विचारें दौलतीचें काम पहावें व रा. ब. देशपांडे यांनीं उभयतांचे विचारें काम करावें असा ठराव झाल्याचें ऐकतों. व त्याबद्दल मे. पार साहेब जाइंट आडमिनिस्ट्रेटर यांची स्वारी गेले आठवड्यांत येथें येऊन लागलीच परत गेली. सदर्हू ठराव सहा महिन्यांचे मुदतीनें झाला आहे तेव्हां श्रीमंत तात्यासाहेब हे आपल्या दौलतीचें काम चांगलें चालवून दौलतीचा पूर्ण अधिकार आपले हातीं घेतील असें आह्मी इच्छितों. व रा. ब. देशपांडे हेही तात्यासाहेबांच्या सल्याप्रमाणें वागतील तर ते फारच लोकप्रिय होणार आहेत असें आह्मांस वाटतें. सदर्हू व्यवस्था चांगले प्रकारें राहील तर दोन तीन महिन्यांतच सरकारास रिपोर्ट करून कर्नल पार साहेब पोलिटिकल एजंट हे अधिकार देतील असें वाटतें. तर इकडे उभयतांनीं लक्ष द्यावें.

महाराणी साहेबांचा नित्यक्रम.— उन्हाळा असो हिवाळा असो सकाळीं सात वाजतां उठावयाचें व वेळाची किंमत लक्षांत ठेवून प्रत्येक तासाला नेमून दिलेलें काम त्या त्या वेळेस करावयाचें. त्यामुळें त्यांच्या सहीसाठीं जेवढे कागदपत्र येतात तेवढे लक्षपूर्वक पाहून त्यांची व्यवस्था होते. शिवाय त्यांस नानाप्रकारच्या विषयांवर पत्रव्यवहार ठेवण्यास वेळ सांपडतो आणि सरकारी कामास, चालण्यास, फेरफटका करण्यास, भेटीस, व परत भेटीस वेळ मिळून. दररोज निरनिराळ्या भाषांतील मजकूर वाचण्यास वेळ मिळतो. याकडे इकडील राजेरजवाडे लक्ष देतील काय? सु. प.

## नोटिस.

कृष्णा विन सखाराम सोनार रहाणार मौजे जामठी ता. मलकापूर जिल्हें बुलडाणें यांस नोटिस देणार भिमा मर्द कृष्णा विन सखाराम हल्लीं वस्ती शेगाव ता. खामगांव इजकडून नोटिस देण्यांत येतेकीं तुशी माझेशी रीती प्रमाणें लग्न झाल्यास १७।१८ वर्षें झालीं तेव्हा पासून तूं मला नीट रीतीनें वागविलें नाहींस. मध्यंतरीं एक दोन वर्षें तुझे जावयानें मला नेऊन तुझे गळ्यांत मला घातली त्यावेळीं तुझे पासून मला एक मुलगी झाली तीहि मरून गेली. हल्लीं मुलगी झाल्यावर ६ वर्षें होत आलीं तूं मला वागविलें नाहींस. तेव्हांपासून मीं आपले जावयाचे घरीं निर्वाह करून रहातें. व त्याजबद्दल मला अन्न वस्त्राचे रुपये ५०० कर्ज झाले आहे. आतां मला दुसऱ्याचे घरीं राहून उदरनिर्वाह होत नाहीं व माझें वय तारुण्याचें असल्यामुळें संसार करणें अवश्य याजकरितां तुह्मी मला वागविण्यास तयार नसल्यास मला दुसरा घर ठाव केला पाहिजे याकरितां मुद्दाम ह्या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं आज पासून १५ दिवसांचे आत तूं येऊन निकाल करावा तो असा कीं मला वागविण्यास तूं तयार असल्यास त्या प्रमाणें पंच मार्फत माझी खात्री करून द्यावी. दुसरें मला अन्न वस्त्रा बद्दल झालेला ६ वर्षांचा खर्च रु. ५०० आणून द्यावा. ह्या पैकीं कांहींच न केल्यास वरील मुदतींत मला फारकत करून द्यावी किंवा तसें न करण्यास तुमची जी हरकत असेल. ती कळवावी. वरील कलमा प्रमाणें कांहींच न केल्यास मी खुशाल घरठाव करीन व मग तुमचा मजवर कोणतेही प्रकारचा हक्क रहाणार नाही व अन्न वस्त्राचे रु. ५०० व ह्या नोटिसीचा झालेला खर्च तुह्मावर दिवाणींत फिर्याद करून भरून घेतला जाईल.

येणेप्रमाणें मजकुराची नोटिस गुदस्तसालीं उर्दूअखबार पत्रांतून छापून तुला पाठविली तिला एक वर्ष झालें तरी तू मजविषयीं कांहीं काळजी केली नाहीस तेव्हां सरकारांतून कायदेशीर तजवीज करून घेणें आतां भाग आहे; तरी तूं माझा प्रत्यक्ष नवरा आहेस ह्मणून आतां कदाचित शुद्धीवर आला असशील व आपला दुर्लौकीक होऊं देणार नाहीस असें मनांत आणून पुन्हा येकंदर तुला कळविलें आहे, या प्रमाणे तूं न वर्तल्यास तुझा मजवर कांहीं हक्क राहणार नाहीं व पोट खर्चाबद्दल झालेले कर्जाबद्दल तुजवर फिर्याद करीन व कायदेशीर दुसरा घरठाव करीन हें पक्कें समजावें. पहिल्या नोटिशीचा जबाब न दिल्यामुळें ही दुसरी नोटिस दिली आहे तर दोहीचा खर्च तुला द्यावा लागेल. कळावें. ता. ३० माहे जून सन १८८० इ.

( सही. ) भिमी मर्द कृष्णा विन सखाराम सोनार दस्तुर गणोबा सिवराम
जी वस्ती शेगाव दस्तुर खुद.

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत रा० रा० खेंडराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख १२ माहे जुलै सन १८८० इसवी. अंक २७

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | ४. |
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## नोटिस

महादु वल्द भिकाजी ताले जात कुणबी रहाणार मौंज बादलपुर तालुके अकोले यास खंडूजी वल्द संभाजी पाटील मौंजे बादलपुर तालुके मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मूं मौंजे मजकूरचे शेत सर्वे नंबर ३९ यांतील चवथा हिस्सा जयराम ठाकरे याजपासून खरीद घेतला; परंतु सदहू शेताचे पोट भागिदार आह्मी आहो ह्मणून त्यांतील चवथाई हिस्सा तुह्मास घेण्यास अधिकार नाहीं. कारण त्याचे हक्कदार आह्मी आहो ह्मणुन ही मुदाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून ८ दिवसांचे आंत तुह्मी जयराम यांस दिलेले रुपये परत घेऊन जावे व सदहू नंबरांतील चवथ्या हिश्शावरलीं हक्क सोडावा. याप्रमाणें न केल्यास रिती प्रमाणें तजवीज करून या नोटिशीच्या खर्चा सुद्धां सदहू हिस्सा परत घेऊं. कळावे तारीख १० माहे जुलै सन १८८० इसवी.

( सही ) खंडूजी वल्द संभाजी पाटील
निशाणी खुद.

नोटिस.

कनीराम बलदेवजी मारवाडी रहाणार आपोती तालुके अकोलें यास हुकूमचंद गिरधारीलाल मारवाडी दुकान पळसो तालुके अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचे कोलखेडे एथील दुकानचे रुपये आपोती एथील दुकानावर १४४८८६ एकशे चवेचाळीस आठ आणे सहा पै येणें आहेत. ते रुपये आह्मी तुह्मास दोन तीन वेळा मागितले पण तुह्मी देतों देतों असे ह्मणून चाळविता परंतु अजून देत नाहीं. ह्मणून ही नोटिस मुदाम दिली आहे तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आमचे सदरील रुपये व्याजा सुद्धां आह्मांस आणून देऊन आमची पावती घ्यावी. सदरील मुदतींत रुपये न दिले तर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून कोर्टाच्या खर्चा सुद्धां भरून घेऊ. व या नोटिसीचा खर्च तुह्मावर बसेल. कळावें, तारीख ६ माहे जुलै सन १८८० इसवी.

( सही ) हुकूमचंद गिरधारीलाल
मारवाडी दुकान पळसो
तालुके अकोला
दस्तुर खुद.

नोटिस.

राघोजी वल्द बसवाजी पाटील मौंजे बाखराबाद तालुके अकोले. यास वैजाजी वल्द हरीबा माळी रहाणार मौंजे मजकूर तालुके मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आह्मी सखाराम पंतोजी पासून लागोड मसाल्या साठीं कर्ज काढिलें होतें त्याला तुह्मी जामीन होते व शेतांत तुमची आमची भार्गीण असल्यामुळें सन १२८७ फसली सालीं पौषमासीं आमचे हिशाचा कापुस १० मण (१०॥ टक्याचे पासरीनें) सावकारास देण्याकरितां नेला व तुह्मी आह्मास जामीनदार असल्यामुळे आह्मी तुमच्या हवाली केला. परंतु सदहू कापूस तुह्मी अजून सावकारास दिला नाहीं असें त्याचे सांगण्यावरून समजतें ह्मणून ही तुह्मास मुदाम नोटिस देण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत त्यावेळच्या ९० रुपये भावानें ४५ पंचेताळीस रुपये झाले ते व्याजासह सावकाराकडे आदा करावे. न केल्यास पुढें सावकारानें फिर्याद केल्यास मी जबाबदार होणार नाहीं त्याचे व्याजासुद्धा त्या नोटिशीच्या आणि कोर्टाच्या खर्चासुद्धा रुपये तुह्मास द्यावे लागतील हें खूप समजावें कळावें.

( सही ) वैजाजी वल्द हरीबा माळी
निशाणी खुद.

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकुर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

दारव्हा एथून ता. ५ जुलै.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि० वि० आपल्याकडे खालील चार ओळी लिहून पाठविल्या आहेत त्यांस येत्या अंकीं जागा द्याल ही आशा आहे. मी फिरतें फिरत दारव्हे येथें आलों. माझा धंदा भिक्षुकीचा तेव्हां येथें कांहीं मिळेल या आशेनें बरेच दिवस राहिलों होतों तितक्यांत जो मजकूर ऐकिला व पाहिला तो येणें प्रमाणें- या गावांतील लोक यंदा इतके आनंदी होते कीं त्यांचा आनंद त्यांच्या हृदयांत मावेनासा झाला होता. आतां मंडळीचा व माझा परिचय पडल्यामुळे मी त्यांस विचारिलें कीं अहो, इतका आनद झाला तरी कशाचा? तेव्हां त्यांनीं आनंद होण्याचें कारण सांगितलें कीं, आमचा गांव दोन गोष्टींनीं प्रख्यात आहे पहिलें कारण एथें दर तिसरें वर्षीं पाण्याचा दुष्काळ पडावयाचा व तो इतका कीं आह्मांस त्या सालीं या देशास मारवाडच ह्मणावें लागे. परंतु यंदा दुष्काळ पडावयाचें साल असून पाण्याची अगदीच कमताई पडली नाहीं दुसरें एथें दर वर्षास शेपन्नास घरें जळालीं नाहींत असें एकही सालांत नाहीं. गतवर्षीं एथें या कामाबद्दल सरकारानें इतका बंदोबस्त केला होता कीं मुदाम पोलिस इन्स्पेक्टर व कांहीं शिपाई यवतमाळाहून पाठविले होते. ते रात्रंदिवस त्यांच्या कडून जितकी मेहेनत करवली गेली तितकी करितच होते परंतु त्यांस कांहीं यश मिळालें नाहीं मात्र आग लावणारानीं आपलें इतकें कसब त्यांस दाखविलें कीं सरकारी शाळा व साहेब लोकांचा उतरण्याचा बंगला यांस सुद्धां आग लाविली होती. परंतु ती लौकरच नजरेस येऊन विझविली गेली. या सालीं मे० मुबारक अली साहेब तहशीलदार हे येथें नवीनच आले होते. व त्यांचें लक्ष कामाकडे असावें तसें नव्हतें; कारण त्यांचेवर मूर्तिजापूर येथील वामनराव जमादार यांनीं फिर्याद केली होती त्या खटपटींत त्यांस वारंवार जावें यावें लागत असे. परमेश्वरकृपेनें त्यांस त्या कामांत यश आलें व शत्रूस त्याच्या वाईट कामाबद्दल योग्य शिक्षा मिळाली. असो वर लिहिल्याप्रमाणें यंदा कांहीं पोलिसचा बंदोबस्त नव्हता. फक्त मेहेरबान मुबारक अली तहशीलदार व रा. रा. मोहकमासिंग चीफ कान्स्टेबल या उभयतांनीं इतका बंदोबस्त ठेविला होता कीं सर्व उन्हाळ्यांत दोनच घरें जळालीं तहशीलदार यांचे सर्व लक्ष याच कामाकडे असल्यामुळें या सालीं असा चांगला परिणाम झाला त्याजबद्दल त्यांची तारीफ करणें योग्य आहे.

घर जळाल्यानें काय काय अनर्थ होतात व लोकांची काय दशा होते ती कोणासच प्राप्त झाली नाहीं. एथील सर्व रयत त्यांस दुवा देत आहे. सदहू गृहस्थ या गावांत आल्यापासून गाव सुशोभित करण्याचे कामांत रात्रंदिवस खटपट करीत आहेत. एथें दुकानें फारच थोडीं होतीं व तीं इतकीं भरभराटीचीं होतीं कीं पैशाची सुंठ पाहिजे तर चार दुकानांतून जमा करावी लागत असे. हल्लीं तसें नसून दुकानें बरींच झालीं आहेत व एक बोहाऱ्याचें दुकान नवीन आलें आहे तें आल्यापासून एथील लोकांस फारच सुख झालें आहे व याचप्रमाणें आणखीही दुकानें होत आहेत. एथील ना. तहशिल्दार रा. रा गोविंदराव आर्वे हेही आपल्या अधिकाराप्रमाणें आपले कामांत हुशार व मुख्यत्वें करून आकौंटंटचे कामांत हुशार आहेत. हे यंदा परीक्षेचा अभ्यास करीत आहेत त्यांस त्यांचे कामांत यश मिळो.

रा. रा. राजय्या एथील हास्पिटल असिस्टंट हेही आपले कामांत दक्ष आहेत व मोठे लोकप्रिय आहेत. थोड्या दिवसांपूर्वीं एथील रा. रा. सखाराम बापू दस्तकी पाटील यांचा हात इतका भाजला होता कीं, तो बरा होण्यास खचित तीन महिने लागते परंतु सदहू डाक्टर यांनीं तो हात सुमारें पंध्रा दिवसांत जसाचा तसा साफ करून दिला. याजबद्दल बापू साहेब यांनीं एक पन्नास रुपयांचें घड्याळ व रोख रुपये ५० येणेंप्रमाणें डाक्टराला देणगी दिली.

एथील हेडमास्तर रा. रा. अण्णाजी विनायक गोखले आपले काम चांगल्या रीतीनें करीत आहेत.

एथील पोस्टमास्तर रा. रा. गंगाधर सुकदेव यांचा पुनर्विवाह करण्याचा हेतु आहे व ते याबद्दल पुष्कळ खटपट करीत आहेत वधूही त्यांनीं पुष्कळ पाहिल्या व पुकळ वधूस त्यांचे आई यांस बाप देण्यास कबूल आहेत परंतु सदहू मास्तर यांचा वधू मिळवावयाचा असा हेतू आहे कीं जीस मासें लग्न अद्यापपावेतों होण्याचें आहे असे वाटावें जे वधूचें वय सुमारें ९।१० वर्षांचे असावें. कळावें ही विनंती.

एक
फिरस्ता भिक्षुक.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यास—

वि. वि. महाराज, आपले तारीख ५ माहे जुलै सन १८८०. चे २६ वे अंकांत वाशिम येथील बातमीदारानें परजन्याचे वगैरे शुष्क हकीकतीची बातमी आपल्यास दिली आहे आणि त्यांत तो दर आठवड्यास सभा होण्याची इच्छा दर्शवितो ह्मणून आज मला लेखणी हातीं धरणें प्राप्त झालें सबब च्यार ओळी आपले कडे पाठविल्या आहेत त्यास येते अंकीं कृपा करून जागा द्याल अशी आशा आहे. बातमीदारानें दिलेले बातमीशिवाय पुष्कळ महत्वाच्या बातम्या येथें लिहिण्यासारख्या होत्या परंतु त्या आपले बातमीदारानें कां दिल्या नाहीत यांतील इंगीत कळत नाही. थोडे दिवसापूर्वीं वाशमांत प्रसिद्धपणें सोमयज्ञ झाला त्यांत चार पशूची आहुती झाली ही अत्यंत महत्वाची गोष्ट वऱ्हाडात प्रथमतांच घडलेली आपले बातमीदारानें कां बरे कळविली नाही ? तसेंच मौंजे मोप तालुके वाशीम येथील डाक्याबद्दलची हकीकत कोणी एका बातमीदारानें आपल्यास सादेंत कळविली होती परंतु त्या नंतर डाकेखोर लोकांचा पत्ता कसा लागला वगैरे मजकुर आपले पत्रीं आला नाही तो तरी मजकूर आपले वाशीमकर बातमीदारानें

महत्वाचा समजून कळविण्याचा होता पर्जन्याची शुष्क बातमी लिहून सभा भरविण्याची इच्छा दर्शविली. सभेची अभिरुची आपले बातमीदारास कां प्राप्त झाली आणी त्यापासून त्यास कोणता गुण ग्रहण करणें आहे हें तो पुढील पत्रीं दर्शवील तर मला वाटतें एथील सरकारी कामगार लोक त्याची इच्छा पूर्ण करतील.

पत्र विस्तार होतो सबब अधीक न लिहितां पुरें करतों कळावें कृपालोभाची वृद्धी असावी हे विनंती मुक्काम वाशीम तारीख ६ जुलै १८८०

एक क्ष

---

वऱ्हाडसमाचार.

मिति आषाढ शुद्ध ५ शके १८०२

## नेटिव व युरोपियन यांची मिसळ.

पेशवाई अखेर इंग्लिश लोकांचें हिंदुस्थानांत राज्य झाल्यास साठ वर्षे होऊन गेलीं इतक्या काळांत हजारो इंग्लिश कामदार या देशांत कामावर येऊन पेनशनर होऊन परत गेले, कित्येक मरण पावले, व शेकडो हल्लीं कामावर आहेत. इंग्लिश लोकांची रहाण्याची, वागण्याची, व स्वभावाची तऱ्हा आमच्या लोकांच्या तऱ्हेपेक्षां भिन्न आहे. कारण त्यांचीं देश वेगळा, हवा पाणी वेगळें, त्यांस शिक्षण वेगळें, त्यांच्या रिती भाती वेगळया व त्यांचा धर्म वेगळा यामुळें जरी ते आह्मावर राज्य कारभार करावयास आले आहेत तरी आह्मापासून ते फार वेगळे रहातात. सरकारी हुद्याच्या नात्यानें त्यांनीं आह्मा लोकांशी थोडे तास काय संबंध पडत असेल तेवढाच. बाकी आह्मांपासून ते सर्वतोपरी अलग. त्यांचीं रहाण्याचीं घरें आमच्यापासून वेगळी, त्यांचे जमण्याचें मंडळ वेगळें, त्यांचें क्लब वेगळें, फार काय सांगावें ते आह्मापासून इतके वेगळें कीं जसे पशु आणि पक्षी. एक जमीनीवर आणि एक अंतराळीं. असा प्रकार आजवर होत आला आहे. असें होण्यास सुयुक्त कांहीं कारण आहे असें दिसत नाहीं- नेटिवास हलके व तुच्छ, मानण्याची इंग्लिश लोकांची एक साधारण समज व तिला अनुकूळ असे त्यांचे अधिकार मोठे त्यांमुळें त्यांस सहजी बेपरवाई होऊन तेल व पाणी कधीं मिसळून रहाव याचें नाहीं त्याप्रमाणें इंग्लिश लोक आमचे लोकांशीं मिसळून रहात नाहींत व या गोष्टीचा अधिकाधिक विचार केला ह्मणजे आह्मांस फार वाईट वाटतें व या बाबदींत इंग्लिश लोकांची मोठी गैर समजूत व चूक आहे असें आह्मी मानितों.

ते मनुष्य प्राणी व आह्मीही ईश्वरकृपेनें मनुष्य प्राणी आहोत तेव्हां सजातीय अतएव दळणवळणास व संमिश्रणास पात्र आहोत. दुसरें, ते आमचे राजे व आह्मी त्यांची प्रजा या नात्यानें त्यांचा आमचा आप्त संबंध आहे त्यामुळेंही ते व आह्मी एकत्र होणें अवश्य आहे. तिसरें, ते विद्येनें व ज्ञानानें आमच्यापेक्षां वरिष्ट आहेत त्यामुळें साहजीक भुतदया व उदारदृष्टीही त्यांच्यामध्यें जागरूक असावी व तिच्या योगानें त्यांनीं आह्मांस धिक्काराई असे वेगळें टाकूं नये. चवथें, राजधर्मानें पितृवात्सल्य त्यांच्या ठायीं येतें तेव्हां लेकरें मूर्ख किंवा नीच ह्मणून मायाळु वाडिलांनीं त्यांनां दूर करून उघडीं पडूं द्यावीं हें योग्य नाहीं. असें असतां बहुत इंग्लिश लोक तसे वागतात तेव्हां आह्मा लोकांस त्याबद्दल कां वाईट वाटणार नाहीं? अवश्य वाटेल.

मागील जुलमी व अपमतलबी राज्यें जाऊन सांप्रत इंग्लिश सरकारचें राज्य झालेलें आहे. हें राज्य ह्मणजे दया धर्माचें, नीतीचें, न्यायाचें व समान अधिकाराचें आहे असें याचें ब्रिद असतां यांत शहाण्या मनुष्य जातीनें वेड्या मनुष्य जातींशीं केवळ उग्र पशूप्रमाणें वांकून रहावें हें त्यांच्या सत्शीलतेस मोठें दूषण आहे. आह्मी स्वराज्य भ्रष्ट आहो ह्मणून कांहीं पातकी नाहीं, उलटे दयेस पात्र आहो. व उत्तम विद्वान आणि महत्पदाधिकारी नाहीं हा आमचा कांहीं गुन्हा नाहीं व त्यासाठीं अवहेळणेची शिक्षा ही आह्मास कायदेशीर नाहीं. उलटें सरकारच्या दयाधर्माच्या तत्वानें आह्मांस बरेंच विद्यादान मिळून व आमच्या चालीरीती सुधारत जाऊन इंग्लिश लोकांच्या सद्यत्वास व शुद्ध मनोवृत्ती विकत करून दाखविण्यास आह्मी बरेंच पात्र झालों आहो तेव्हां मागचें काय घडलें तें घडो परंतु यापुढें तरी आह्मामध्यें इंग्लिश लोकांनीं मिसळूं नये इतके परके व भिन्न मानण्याजोगे आह्मी नाहीं हें सहृदय इंग्लिश लोकांनीं विचारपूर्वक पाहिलें असतां तेव्हांच त्यांच्या ध्यानांत येणारें आहे. अस्तु.

सरकारचीं कामें अधिकाराच्या जोरानें कशीं तरी तडीस जातात. परंतु इंग्लिश लोकांस इतकें लांब पाठविण्यांत मुख्य सरकारचा इतकाच उद्देश नाहीं. इंग्लिश लोकांनीं आमच्यामध्यें मिसळून वागावें व त्या योगानें आह्मामध्यें कुटुंबसुधारणा, लोकसुधारणा ग्रामसुधारणा व देशसुधारणा होऊन आमचें व सरकारचें सर्वोपरी कल्याण व्हावें असा मूळामध्यें हेतु आहे. व तो आह्मी इच्छितों त्याप्रमाणें इंग्लिश लोक वागतील तर खचित लवकर सिद्धीस जाणार आहे. त्यांच्या खासगीच्या दळणवळणानें व नित्यसहवासानें आह्मामधील वाईट गुण जाऊन चांगले गुण येणार आहेत व तसा त्यांनांही आह्मापासून कांहीं फायदा होण्याचा संभव आहे; सबब तसा प्रघात पडला तर फार चांगलें होईल. बाकी कोणावाचून कोणाचें अडत नाहीं, इंग्लिश लोकांस तर आमची गरज नाहीं तेव्हां त्यांचें काय अडणार; पण आह्मा गरजू लोकांच्याही त्यांचे राज्याखालीं राहून आज दोन पिढ्या गेल्या तेव्हां कसें तरी राहाटगाडगें चाललेंच, अडलें नाहीं. इंग्लिश लोक आमचे घरीं न आल्यानें आमच्या मुलांच्या लग्न मुंजी राहिल्या नाहींत किंवा आमचे सणवार राहिले नाहींत. पण त्यांतच ते आमचे घरीं आले व आह्मांत मिसळले तर आह्मांस संतोष वाटतो व ती एक प्रकारची विशेष शोभा झाली असें आह्मांस वाटतें. मनुष्य जन्म एकवार आहे व त्यांतही या आवश्यक गोष्टी करण्याच्या प्रसंगाचा थोडाच नियमित काळ आहे. नोकरीवर येणें व पेनशन घेऊन जाणें याच्या मधला अवधी. ते वढ्यांत कोणीं कांहीं विशेष केल्यास त्याच्या जन्माचें सार्थक होणार आहे व त्याचें नाव पुढें निघणार आहे. वेळ गेल्यावर मनांत येऊनही कांहीं उपयोग नाहीं. सबब सर्वांनीं सर्वांशीं स्नेहभावानें वे मिळून मिसळून वागावें हें अत्यंत अवश्यक आहे असें आह्मांस वाटतें.

आनंदाची गोष्ट अशी कीं कित्येक इंग्लिश लोकांसही अलीकडे असें वाटूं लागलें आहे व त्याकरितां ते प्रसिद्धीस येऊं लागले आहेत. या प्रसंगीं आमचे उत्तमलोकवासी डाक्टर सिंक्लेर साहेब यांची आह्मी आठवण करून ते निवर्तल्याचें दुःख मानितों. ते आमच्या लोकांत आगत्यपूर्वक मिसळत असत. नळदुर्गाकडे टेलर साहेब होते त्यांची आख्या अशीच आहे. हायकोर्टाचे जडज जस्टिस पिन्ही साहेब यांनां आमच्या मंडळींत मिसळून वागण्याची आवड आहे. नगरचे जडज मि० वेडरबर्न साहेब आमचे लोकांविषयीं फार आस्था दाखवितात व खरोखर मायाळुपणानें वागतात. त्यांनीं व त्यांच्या पत्नीनीं रत्नागिरीस व अहमदनगरास मोठ्या हौसेनें पुष्कळ हिंदुलोकांस बायका मुलांसह आपले बंगल्यावर भेटीस बोलाविलें होतें व त्यासाठीं मोठा समारंभ आणी उत्सव केला होता. सुरतेस मेहेरबान बर्डवुड साहेब यानीं आमच्या लोकांस निमंत्रणें करून त्यांच्या भेटी घेतल्या होत्या व गेल्या आठवड्यांत पुण्यास मुंबईचे राईट रेवेरेंड लार्ड बिशप साहेब यानीं सुमार १०० नेटिव गृहस्थांस अगत्यपूर्वक आपल्या येथें बोलावून त्यांचा चांगला आदरसत्कार केला. व अशा गोष्टींची आह्मांस फार आवड आहे असें बोलून दाखविलें.

याचप्रमाणें ठिकठिकाणीं कलेक्टर, जडज, कमिशनर, डिपुटी कमिशनर, व त्यांचे असिस्टंट आमचे लोकांशी प्रेमभावानें वागतील व आह्मांत मिळूं मिसळूं लागतील तर फार चांगलें होईल.

---

तारीख ३ चे उर्दूअखबारांत राव बहादुर डायरेक्टर साहेब यानीं केलेले डेपोंतील २० रुपयांचे कारकुनीचे नेमणुकीबद्दल कांहीं मजकुर लिहिला होता त्यावर राव बहादुर यानीं एक पत्र उर्दूअखबारकर्त्यास लिहिलें तें पर्वाचे पत्रांत आमचे बंधूनीं छापिलें आहे. व त्यावर इंग्रजींत बरीच टीका केली आहे. याविषयीं खरी हकीकत आज आह्मी इंग्रजींत दिली आहे व मराठी वाचणारांकरितां त्याचा सारांश खालीं लिहितो:—

गोपाळ विश्वनाथ याची नेमणूक करण्यांत डायरेक्टर साहेबांनीं मे० रेसिडेंट साहेबांचे नुकत्याच झालेल्या सर्क्युलरास हरताळ लाविली या ह्मणण्यास कांहीं आधार नाहीं हा इसम सुमारें पांच वर्षे सतत वऱ्हाडांत आहे आणि त्याने हा काळ खानगी नोकरींत घालविला आहे. आह्मी कालपासून रेसिडेंट साहेबांचें सर्क्युलर दोन तीन वेळां वाचलें परंतु अशा मनुष्यास नेमण्याविषयीं रेसिडेंट साहेबानीं केलेली मनाई कोठें आढळली नाहीं. आह्मी ऐकतों कीं कायमचा मनुष्य थोडे माहेन रजेवर गेला आहे आणि ही नेमणूक थोड काळाकरितां आहे. शिवाय या कामास जमाखर्चाची व हिशेबी लिहिण्याची ज्याला विशेष माहिती आहे अशा मनुष्याची जरूरी आहे. शाळाखात्यांतील मनुष्य या जाग्यावर नेमण्याचा ह्मटला ह्मणजे दहा, पंध्रा, किंवा वीस रुपयांचा मास्तर नेमला पाहिजे. या कामास लायख व अनुभविक असा मनुष्य हलके पगाराचे मास्तरांत सापडेल अशी कल्पना केली तरी थोड्या महिन्यापुरता एकादा मास्तर काढून त्याची शाळा खराब करावी हें कोणासही प्रशस्त वाटणार नाहीं. म्याट्रिक्युलेशन किंवा दुसरी परीक्षा पास झालेला मनुष्य या कामास योग्य असतोच असें नाहीं. आणि डायरेक्टरचे आफिस, डेपो व एजुकेशनल इन्स्पेक्टरचें आफिस यांत मराठी कारकून दुसरा नाहीं ह्मणून चांगला हुशार कारकून त्या जागेवर असणें अवश्य आहे. याकरितां डायरेक्टर साहेबांस जो मनुष्य योग्य वाटला त्याची त्यानीं नेमणूक केली. आमचे ऐकण्यांत असें आहे कीं ही जागा भरावयाची नाहीं असें डायरेक्टर साहेबांनीं कोणासही सांगितलें नाहीं व पुण्यांतील कोणी निकटसंबंधी मनुष्यानें शिफारस पत्र दिलें होतें हे उर्दूअखबारकर्त्यांचे लिहिणें अगदी निराधार आहे.

राव बहादूर भाई साहेब सक्त आहेत व कोणी कामाची हयगय केली तर क्षमा करीत नाहींत ही गोष्ट प्रसिद्ध आहे परंतु ते न्यायी व निःपक्षपाती नाहींत किंवा कोणतीही नेमणूक करतांनां खासगी गोष्टीकडे ते कांहीं लक्ष देतात असें कधीही कोणी ह्मणत नाहीं याकरितां कांहीं आधार नसतां त्यास दोष देणें व्यर्थ आहे.

---

We have been pained to observe that our wortby Director of Public Instruction has considered it necessary to notice a paragraph published in the Marathi portion of the *Urdu Akhbar* of 3 rd instant. We need not inform our readers that the frivolous effusions of that journal are generally considered beneath notice & that few gentlemen allow them to disturb their equanimity. Moreover the character of Rao Bahadur Narayen Bhai for thorough impartiality and strict justice is too firmly established & too well known to be shaken in the slightest degree by the misstatements of our local contemporary and we therefore think that it would have been better if no notice had been taken of the remarks of the *Urdu Akhbar* regarding an acting appointmeut made by the Director.

As however matters have gone so far, we give below the facts of the case. The Editor of the *Urdu Akhbar* in his issue of the 3rd instant called the attention of his readers to the appointment of Gopal Vishwanath as Karkoon in the Government Book Depot and declared that it was contrary to the instructions contained in the recent circuler of

the Resident. He also said that men matriculated from Berar and others had applied for the place but that they were informed by the Director that the place was not to be filled up. The Editor concluded this paragraph by saying that the person employed had been recommended by a close relation of the Director at Poona.

When this paragraph was brought to the notice of Rao Bahadoor Dandeker he wrote a letter to the Editor asking him to explain what he meant by saying that the Resident's circular has been disregarded and requested him to state what authority he had for making the other statements. The Editor has made a capital out of this letter and founded an article on it with the imposing title of "THE DIRECTOR OF PUBLIC INSTRUCTION AND OURSELVES" But if our readers have patience to go through that article they will find that the replies to the Director's letter are either too vague or unsatisfactory. We have made full inquiries into the circumstances of the case and the result is as follows.:—

We learn that the place of the Karkoon has not been permanently vacated, the incumbent having gone on a few month's leave; and that the appointment which has been criticised is only temporary. An experienced accountant was required for the place and the Rao Bahadur selected the best candidate on the spot that could be got to act for a short time. Gopal Vishwanath has been in Berar for several years and served in three or four private offices in the province; and in giving him the appointment the Director has not "crossed the limits of the Book Circular" in any way. It is evident that the writer in the *Urdu Akhbar* has not either understood the Circular or has thought it necessary to misrepresent it wilfully. We are also informed that the Director did not tell any person that the place was not to be filled up. and that there is not the slightest foundation for the statement that the man was recommended by a relation of the Director at Poona.

It is well known that Rao Bahadur Narayen Bhai Dandekar is somewhat strict to his subordinates and never allows neglect of duty to go unpunished; but his conduct is never influenced by personal considerations and he has never been accused of partiality even by the bitterest and most unscrupulous of his detractors.

---

Mr. T. Vital apothecary and Honorary Civil Surgeon of Ellichpur has been transferred to the pension establishment. This gentleman has risen to the important post he now vacates, from sheer perseverance; but we are sorry to observe that his closing career will not unfortunately be as brilliant as was his onward course, being placed under the ban of censure by the officiating Resident for not carrying out certain instructions connected with the classification of convicts, promulgated for the better discipline of prisons. It will be gratifying to learn that his explanation when submitted will exondrate him from the blame now attributed to him.

---

## वऱ्हाड.

या आठवड्यांत पर्जन्यानें पुन्हा ओढ दिली. साऱ्या आठवड्यांत पावसाचें नाव नाहीं तेणें करून कपाशीच्या झालेल्या पेरण्याचे आलेले अंकूर सुकून जाण्याचे लागास आले आहेत. व जोंधळे वगैरे पेरणीची फार काळजी आहे. या वर्षाच्या पर्जन्याचें मान कोणत्या थरावर जाणार कळत नाहीं.

---

अगरच्या परत सेशन मुकदम्याची आज चौकशी आहे.

---

खामगावची आगगाडी पहिले तारखेपासून बंद झाली.

---

मूर्तिजापुरास शास्त्रयाचे सुनेनें विषप्रयोग करून नवरा वगैरेस मारीलें त्याची चौकशी रा. रा. रामराव गोविंद फर्स्टक्लास माजिस्ट्रेट यांपुढें होऊन त्यांनीं तिला सेशनकमीट केलें.

---

उमरावती शहरांत नळाचें पाणी आणण्याचा विचार होता त्याकामीं सरकारची मंजुरात मिळाली असें ऐकतो. उ. अ.

---

मे० नबाब यासीनखा साहेब असिस्टंट कमिशनर यानीं तीन महिन्यांची रजा घेतली. मि० फौलर साहेब त्यांचें काम पाहातील.

---

वऱ्हाडांत मार्च महिन्यांत सर्व प्रकारच्या रोगानें ३७२९ मनुष्यें मरण पावलीं. त्यांत तापानें २२६० व बाकी इतर रोगानें मरण पावलीं. व ७६११ मुलें जन्मलीं.

---

ता० १५ जूनच्या वऱ्हाडच्या पेपर करेन्सि खात्याचा तक्ता प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून कळतें कीं १८८१८ नोटी व्यवहारांत आहेत त्यांत पांच रुपयांच्या ४५०२, दहा रुपयांच्या ४३७७, वीस रुपयांच्या ३७२३, पन्नास रुपयांच्या ३०६१, शंभर रुपयांच्या २९९४, पांचशे रुपयांच्या १०६, हजार रुपयांच्या १३८, व दहा हजार रुपयांच्या ७७ आहेत. यांची किंमत १७०५१९० रुपये आहे. व यांचे मेळास नाणें १४०५१९० रुपयांचें व गव्हर्मेंट सिक्युरिटी ३ लक्ष रुपयांच्या आहेत.

---

मि० ए एफ हिगीन्स फर्स्ट ग्रेड असिस्टंट इंजिनियर सिंकदराबादेहून परत येऊन खामगावास आपले कामावर रुजू झाले.

---

उमरावती रेल्वेवरून मे महिन्यांत ११३० टन माल आला गेला. व त्यावर ल ५३१८ रुपयांचें रेल्वेला उत्पन्न झालें. गुदस्त सालीं याच महिन्यांत ३९८४ टन माल जाऊन ६४५३ रुपये उत्पन्न झालें होतें. यांवरून साल मजकुरीं या महिन्यांत ११३९ रुपयांचा तोटा झाला असें कळतें.

---

खामगाव रेलवेचा मे महिन्याचा हिशेब प्रसिद्ध झाला आहे त्यावरून कळतें कीं त्या रेलवेवरून त्या महिन्यांत २४७६ टन माल आला गेला व त्याचें उत्पन्न ३४४९ रुपये झालें. गुदस्त सालीं याच महिन्यांत १९८३ टन माल जाऊन ४६५० रुपये उत्पन्न झाले होते. तेव्हां १२०१ रुपये तोटा झाला असें दिसतें.

---

वऱ्हाडांत ख्रिस्ती धर्माच्या भजनालया करितां खालीं लिहिलेले गृहस्थ त्या त्या स्थळीं मेंबर नेमिले आहेत.

उमरावती— एच एस निकोलेटस् इस्कायर डिपुटी कमिशनर व आर डब्ल्यु ओडहौस इ० एकाक्षिक्युटिव इंजिनियर.

इलिचपुर— मेजर के जे एल मेकंजी साहेब डिपुटी कमिशनर व तोफ खान्याकडील क्या० सेल्फ साहेब.

अकोला— मे. जे. फिटझरल्ड साहेब डि० कमिशनर व जी सी एटकीन इस्कायर हायस्कुलाचे हेड मास्तर.

हिंगोली— घोडे स्वारावरील मेजर बेल साहेब व क्या० ब्याडले साहेब.

---

मि० ए टी ड्रिस्डेल फारेस्ट खात्याचे डिपुटी कान्सर्वेटर यांनां विलायतेस जाण्याकरितां एक वर्षाची फर्लो रजा मिळाली.

---

सरकारी कामदाराला फ्री पास असेल त्याचा उपयोग सरकारी कामाशिवाय खासगी रीतीनें जाण्यासाठीं कोणत्याही प्रकारच्या रेलवेवर त्यानें करू नये. केल्यास तितक्यापुरता त्याचा ट्राव्हालिंग अलावन्स कमी करावा असा ठराव झाला आहे.

---

मेजर आर बुल्क साहेब डिपुटी कमिशनर यांची रजा विलायत सरकारानें तीन महिने वाढविली आहे.

---

२८ वे काळे पायदळ पलटणीपैकीं क्या. ए. जे. शा. यांची नोकरी हैदराबादच्यां रेसिडेंट साहेबाकडे दिली.

---

मि० एफ डब्ल्यु राइट साहेब पोलिस सुप्रिंटेंडेंट रजेवरून परत आल्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें वर्गावर्गी झाली.

मि० एन आर कंवरलींग साहेब फर्स्ट क्लास आफिशि० सुप्रिंटेंडेंट होते ते सेकंड क्लास झाले. मि० ई जे गनथार्प साहेब आफिशि० सेकंड क्लास सुप्रिंटेंडेंट होते ते थर्ड क्लास झाले. मि० एच ए हीथ साहेब आफिशि० थर्ड क्लास सुप्रिंटेंडेंट होते ते फोर्थ क्लास झाले. मि० ई ए हाबसन साहेब फोर्थ क्लास आफिशियेटिंग सुप्रिंटेंडेंट होते ते असिस्टंट सुप्रिंटेंडेंट झाले.

---

मार्च अखेरच्या ती माहीत वऱ्हाडच्या तहशिलींतून गव्हाची धारण रुपयास ११ शेरांहून कमी होती सबब एप्रिल मे व जून महिन्याबद्दल सर्व सरकारी नोकर ज्यांस ८ रुपये किंवा ८ रुपयांहून कमी दरमहा आहे त्यांस महागाई भत्ता द्यावा असा ठराव झाला आहे.

---

ले. कर्नल ए जी मेन साहेब सिंकदराबादचे क्यांटनमेंट माजिस्ट्रेट रजेवरून परत आले त्यामुळें मि. आर डी हेर साहेब आफिशियेटिंग फर्स्ट असिस्टंट झालेले पुन्हा आफिशि० सेकंड असि० झाले.

---

रा. रा. रामराव गोविंद मूर्तिजापुरचे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर ता० १४ जून रोजीं आपले कामावर येऊन रुजू झाले व त्यांनीं आपली शिल्लक राहिलेली रजा रद्द केली.

---

रा. रा. गोपाळ नारायण व्रह्मे पूर्व वऱ्हाडचे सब इन्स्पेक्टर तिकडे जाण्याकरितां एथें आले आहेत. त्यांचें आफिस नागपुरांत ठेवण्याचा ठराव झाला आहे.

---

रा. रा. गोविंदराव यशवंतराव तहशिल्दार दर्यापुर हे तीन महिन्यांची रजा घेणार आहेत.

---

मि० नारायण बाळकृष्ण गद्रे जुडिशियल कमिशनरचे डिपुटी क्लार्क आपले पहिले जागेवर परत जाणार. आतां डिपुटी क्लार्क कोणास नेमतात तें पहावें. रा. रा. यशवंत महादेव बुल्डाण्यास डिपुटी क्लार्क गेलेले हुशार आहेत त्यांनां या जागेवर नेमिलें तर चांगलें होईल.

---

उमरावतीस आलीकडे पुष्कळ व्यापाऱ्यांचीं दिवाळीं निघालीं.

---

मे० फ्यारर साहेब इन्स्पेक्टर जनरल आफ पोलिस यांनीं ४ महिन्यांची रजा वाढविली. प्र. सिं.

---

रा. रा. बापुजी रंगनाथ ए० अ० क० गेले आठवड्यांत रजेवरून परत येऊन आपले कामावर रुजू झाले.

---

हैदराबादचे अव्वाची मे० सयद नुरूदीन सा. रजेवर गेले होतें ते परत येऊन आपले कामावर रुजू झाले.

---

वाशीम, उमरावती, व बुल्डाणे जिल्ह्यांत ही या आठवड्यांत बिलकूल पाऊस पडला नाहीं. उ. अ.

---

## वर्तमानसार.

म्युनिसिप्यालिटीच्या करासाठीं कोल्हापुरास ३ दिवस दुकानें बंद होती असें इं० प्र० त लिहिलें आहे.

मालवणाम एक बाई मेलेली दहनास नेली तों तेथें ती जिवंत झाली म्हणून तिला घरीं आणिलें नंतर बऱ्याच वेळानें ती पुन्हा मरण पावली पण पुन्हा जिवंत झाली नाहीं.

विलायतचा जून अखेर तीनमाही जमाबंदी वसूल १९॥ कोटि रुपये आहे.

३०वे तारखेत निमाच रेलवे सुरू झाली.

रे० नारायण शेषाद्री दुसरे तारखेस मुंबईहून आगबोटींतून चिनास गेले. पुढें अमेरिकेस ते जाणार आहेत.

मुंबईस पावसाच्या योगानें कांहीं घरें पडलीं. मांडवीकडे एक मोठी इमारत रात्रीं पडली तिच्या खालीं कांहीं माणसें दडपलीं होतीं त्यांपैकीं मध्यरात्रीं २ व पहाटे ६ जिवंत निघालीं.

हिंदुस्थानचा सन १८८०।८१ सालाकरितां जो अजमास केला आहे त्याहून ९ कोटि रुपये अधिक खर्च लागेल असें हिं. स. नें विलायतेस कळविलें आहे.

ठाण्यास रा. सा. चिंतामण नारायण भट मुनसफ यांनीं एका सभेंत, बालविवाहनिषेध या विषयावर बरेंच भाषण केलें. व त्याच बैठकीस ते व दुसरे १४ असामी यानीं असे प्रतिज्ञा लेख केलें कीं मुलगा १८ वर्षांचा व मुलगी १० वर्षांची झाल्याशिवाय आह्मी त्यांचीं लग्नें करणार नाहीं व दुसरे करतील त्यांस बोध करूं. कर्ज काढून लग्न करणार नाहीं. व मुलास निर्वाहाचें साधन असल्याशिवाय व निदान २०० रु० तरी त्याजवळ असल्याशिवाय त्याचें लग्न करणार नाहीं.

गेल्या महिन्याच्या १७ वे तारखेस त्रावणकोरचे नवे महाराज गादीवर बसण्याचा समारंभ झाला. हे पूर्व महाराजांचे धाकटे बंधू असून यांचें वय ४३ वर्षांचें आहे. यांस संस्कृत व इंग्लिश या भाषा चांगल्या येतात. शिवाय प्रामाणिकपणा, दृढनिश्चय व पवित्रपणा यांविषयीं त्यांची ख्याती आहे. त्यांनीं राज्याधिकारग्रहण प्रसंगीं उत्तम भाषण केलें. व या आनंदोत्साहाच्या दिवशीं त्यानीं २६ बंदीवान मुक्त केले. साऱ्याच्या बाकींपैकीं आठ नऊ लक्ष रुपये सूट दिली. व देवालयांच्या दुरुस्तीकरितां पांच हजार रुपयांची वार्षिक नेमणूक करून दिली.

माजी व्हाइसराय लार्ड लिटन साहेब पत्नीसुद्धां मुंबईस जाऊन तिसरे तारखेस हिमालय नावाच्या आगबोटींतून विलायतेस गेले.

पर्जन्य काळचे दुसरेंही नक्षत्र संपत आले परंतु धुळ्याकडे अद्याप पावेतों वृष्टी ह्मणण्या सारखी झाली नाहीं. यामुळें बहुतेक शेतकरी लेकांचे डोळे पावसाकडे लागले आहेत. परमेश्वर काय लाज राखील ती खरी.

मि० गोपाळ बाबाजी हिरपाठक यांस नासिक हायस्कुलावर कायम हेड मास्तर नेमिलें. व धुळे एथें हेड मास्तर मि० महादेव विष्णु काणे हे धारवाडाहून येण्याकरितां निघाले ह्मणून समजतें.

मक्केच्या मुख्य शेरिफाचा कोणी जीव घेण्याचा यत्न केला परंतु त्याचा तो हेतु सिद्धीस गेला नाहीं, असें कान्स्टान्टिनोपलच्या तारेवरून समजतें.

दक्षिण अमेरिकेंत लाप्लाटा नदीच्या कठीं बुयनस ऐरस या नावाचें शहर आहे तेथें दंगा होऊन लेकांनीं शहरास वेढा दिला आहे, व बंदर बंद झालें आहे.

हिरात इराणासच द्यावयाचें असा नेम नाहीं व या बाबतींत इराणाशीं जो पत्रव्यवहार चालला आहे तो आजच पुढें आणण्यासारखा नाहीं तरी चांगल्या रीतीनें राज्यव्यवस्था करणाऱ्या कोणा राजाच्या ताब्यांत हिरात देण्याचा विचार आहे असें इंग्रज सरकारचें ह्मणणें आहे.

जर्मन सरकारच्या पदरीं एकंदर चाळीस हजार लष्करी आफिसर आहेत.

चीनदेश हा हिंदुस्थानच्या पूर्वेस फार दूर आहे, पण हल्लीं चीन व रशिया यांचा जो तंटा माजला आहे त्या ठिकाणीं आपणास जाणें असेल तर पेशावरास जाऊन मग उत्तरेस गेलें पाहिजे; चीनदेश हा रशिया पेक्षां हिंदुस्थानाजवळ आहे, व त्याची राज्यव्यवस्था चांगल्या रीतीनें चालेल तर हिंदुस्थानास रशिया पेक्षा चीन जास्त भयप्रदत होईल असें एक इंग्रज पत्रकर्ता ह्मणतो.

लार्ड रिपन यांणीं आजपर्यंत जो गव्ह० जनरलचे गाडीवर "बाडीगार्ड" असे तो अजीबाद कमी करून व हल्लीं बहुधा ते एकटेच किंवा एक दोन सभ्य गृहस्थ बरोबर घेऊन बाहेर जातात येतात.

ब्रह्म देशांतील राजाचे लेकांनीं सरहद्दीजवळच्या तेगन गोनोवर हला केला यामुळें पुन्हा दंगा सुरू झाला. त्यांनीं तारायंत्राचें आफिस लुटलें, घरे जाळलीं व कोंडवाड्यांतून गुरें वगैरे धरून नेलीं. हे एकंदर २०० लोक असून त्यांजवळ चांगलीं हत्यारें देखील नाहींत. आ. व.

मि० बळवंत रामचंद्र सहस्त्रबुद्धे यांस पुण्याच्या डेपुटी एज्युकेशनल इन्स्पेटरच्या जाग्यावर अक्टिंग प्रमाणें नेमल्याचें कळतें

खडकाळयाच्या आसपास अतिवृष्टीमुळें रेलवेचा कांहीं भाग वाहून गेल्याचें समजतें.

अब्दुल रहमानाकडे जो तहनामा पाठविला होता त्यांतील अटींबद्दल त्याची फारच चुकीची समजूत झाली आहे. त्यानें सर्व सरदारांस जो जाहिरनामा पाठविला आहे त्यांत तो ह्मणतो कीं इंग्रजांनीं मला माझ्या पूर्वजांचा सर्व प्रदेश ह्मणजे काबूल कंदाहार व कुरम इत्यादि प्रांतांची अमीरी दिली आहे हीं त्याची अगदींच खोटी समजूत दिसते. कारण कंदाहार व कुरम हे प्रांत आफगाणिस्थानापासून वेगळे करून बाकी राहिलेलें आफगाणिस्थान आह्मी तुमच्या स्वाधीन करूं असें त्यास कळविलें होतें.

हिरातेहून आयूबखान आपल्या बरोबर ११ पायदळ पलटणी, ३६ तोफा व मोठा रिसाला घेऊन कंदाहारच्या बाजुस येण्यास निघाला असून तो ह्मणतो कीं इंग्रजांनीं लक्षावधि रुपये कंदाहारास खर्च केले असून इंग्रजांस आपण हाकून दिलें ह्मणजे अर्थात च ते आपल्या स्वाधीन होतील.

फौजेवाचून जे बाजार बुणगे आहेत त्यांनीं काबूल सोडून चालतें व्हावें असे हुकूम सुटले आहेत. धान्याचा इतका तोटा झाला आहे कीं फौजेच्या लेकांस दुष्काळाचा अनुभव सहज येत आहे! शहरांत धान्य मुळींच मिळत नाहीं व लेकांचा निर्वाह केवळ फलआहारावर आहे!! जें धान्य शिल्लक आहे तें फौजेस वाटलें जातें.

युरोपांत वडीं अशीं महाराष्ट्रें असून त्या महाराष्ट्रांत तुर्कस्यानचें राज्य खेरीज करून सर्व राष्ट्रें ख्रिस्ती धर्माचीं आहेत. सर्व पृथ्वींत ख्रिस्ति धर्मावर हल्लींच्या काळीं ईश्वराचां पूर्ण कृपा असून बाकीचे धर्म त्यास आवडत नाहींतसे दिसतात! त्याप्रमाणें सर्व ख्रिस्ति राष्ट्रें मिळून टर्कीचा फडशा पाडण्याच्या विचारांत नेहमीं गुंतलेलीं असतात. थोड्या दिवसांपूर्वी रशिया व तुर्कस्थान यांचा युद्धसंग्राम होऊन रशियाच्या अनान्वित करण्यानें तुर्कीसरकारचा अगदी पाडाव झाला, तथापि इतर जीं युरोपियन वडीं राष्ट्रें तीं मुकाट्यानें तमाशा पहात बसलेलीं होतीं. हल्लीं ही तशीच वेळ आली आहे. इतर राष्ट्रांनीं मिळून एक मसलत बर्लीन येथें करून त्या मसलतींत ठराव केला कीं, तुर्कस्थानचा कांहीं भाग जर्मनीच्या हद्दीत जोडून हदीबदलचा तंटा मिटवून टाकावा. ह्या मसलतींत मुसलमानांचें मत मुळींच घेतलें नसल्यामुळें सुलतान ह्या गोष्टीस बिलकुल राजी नसून लढाईची तयारी करीत आहे.

मि० द्वारकानाथ राघोबा तर्खडकर यांस नेटिव प्रेसचे रिपोर्टर मि० करकरे यांचे जागी तूर्त नेमिलें.

गोंडळचे तरूण ठाकूर व आणखी एक राजपुत्र हे उभयतां राजकुमार कालेजांतून नाहींसे झाले असून त्यांचें नाहींसें होण्याचें कारण अद्याप बाहेर आलें नसल्यामुळें फारच ओरड झाली आहे. गेले कोठें?

विश्राम बागेची इमारत बांधण्या करितां ८००० रुपये वर्गणी जमा झाली आहे. इतक्या रुपयांत इमारतीचें काम पुरें होत नसल्या कारणानें हायस्कुलचे हेडमास्तर यांणीं आणखी ५००० रुपये तरी कमेटी कडून मिळण्याविषयीं पुण्याचे कैलेक्टरसाहेबांस अर्ज पाठविला आहे.

करवीरकर श्री० महाराज छत्रपती यांची स्वारी निळगिरीहून पुणें येथें येऊन दाखल झाली. महाराजांच्या बरोबर त्यांचे हुशार व दक्ष कारभारी राव ब० बर्वे हेही आहेत. निळगिरीची हवा महाराजास मानवून प्रकृती बरीच ताळ्यावर आली असेल असें दिसतें, पण त्यांच्या मागें जो जबर विकार दिसत आहे तो अद्याप समूळ नाहीसा झाल्याचें चिन्ह दिसत नाहीं. ईश्वर करो आणि त्यांच्या प्रकृतीस कोल्हापुरची हवा चांगली मानवो असें आह्मी इच्छितों. महाराजांची स्वारी तेथें आठचार दिवस राहून नंतर कोल्हापुराकडे जाणार असें समजतें.

रशियाचा पराभव होऊन चीन लोक खोकंद पर्यंत आले हें सेन्ट पिटर्स बर्ग येथें नाकबूल करण्यांत आल्याचें कळतें. इंग्लंड ह्मणते पराभव झाला व खुद्द रशिया ह्मणतो नाहीं, तेव्हां खरें कोणतें?

हुबळीपासून गोव्यापर्यंत जो रेलवेचा फाटा तयार करण्याचा विचार आहे त्या कामास याच सालांत सुरुवात होणार असून त्यास सुमारें एक कोट रुपये लागतील असा अदमास आहे. या पैकीं ३० लक्ष रुपये गोव्याच्या हद्दीतील रेलवेस खर्च होणार.

कलकत्याकडे एक गाय एका वाघाच्या पिलास आपल्या वासरा प्रमाणें पाजून त्यास वासराप्रमाणेंच चाटते व त्यावर तिची ममताही अतिशय आहे असें कलकत्याच्या एका पत्रांत लिहिलें आहे! वाघास अद्याप समजूं लागलें नाहीं ह्मणून बरें आहे!!

लाहोरकडे एका गृहस्थाच्या गुमास्त्यास दरमहा १०० रुपये पगार असे, पण आफगाण लढाई सुरू झाल्यापासून त्याणें आपल्या घरीं ५ लक्ष रुपयांच्या हुंड्या पाठविल्या असें सांगतात! पु. वै.

---

## लक्ष्मीसरस्वतीचरित्र.

श्लोक शार्दूळविक्रीडित.

हे मद्बांधवहो उगाचि बसता
घेता उदासीनता ।
पाहोनी नयनीं स्वदेशजनजी
जी पावते दीनता ॥
स्वप्राणव्ययही करूनि करणे
तीचे सदां रक्षण ।
हें कर्तव्य महा अहा विसरतां
बाईट हें लक्षण ॥ १ ॥

मालिनी.

विकल सकल गात्रा यद्यपी जाहली ते ।
अजवरि किति कांतें जन्मवीतां अह्मातें ॥
श्रम परि मनिं नाणी पोशितां लेववीतां ।
अवन करुनि आह्मां चुंबितां अंकि घेतां २

शिखरिणी.

अशा या मातेचे श्रम परिहरायास्तव कधीं ।
कृतज्ञत्वा द्याया मन वळवुनी योजिल विधी ॥
अशी चिंता वाटे सतत परि ती निष्फळ घडे
सुषुप्तीची गोडी बहुत जडली नेत्र नुघडे ३
दयाळू हे माता धरि सुपिकता ती न धरिती
कदा अन्या माता जन सतत कष्टास वारिती
तसें नाहीं येथें सकल फलपुष्पें वसुमती
इषद्यत्नें देते ताशि विविध धान्येंहि सुमती
॥ ४ ॥

गीति.

संरक्षाया ईशें
अरिपासुनिया इला हिमाद्रीला ॥
उत्तर पार्थि ठेवियले,
तीन दिशांला तसें समुद्राला ॥ ५ ॥
लक्ष्मीनें बहु विनवुनि
अळवुनि संतत जगन्निवासाला ॥
माहेरसुखासाठीं,
हे भूमी घेतली निवासाला ॥ ६ ॥
गंगा गोदा कृष्णा,
ब्रह्मसुता सिंधु नर्मदा आली ॥
सावित्र्यादि सती ही,
सुखवाया त्या सखिप्रती आली ॥ ७ ॥
सावित्रीच्या संगें,
तत्प्रिय कन्या सरस्वती आली ॥
लक्ष्मीलाचि न केवळ,
परि सकळांलाहि मोह ती घाली ॥ ८ ॥

ओवी.

चौदा विद्या चौसष्ट कळा ।
यांची स्वामिणी जे ब्रह्मबाळा ॥
रूप सौंदर्या नाहींच तुळा ।
ती कां नें जना मोहील ॥ ९ ॥

अनुष्टुप छंद.

लक्ष्मी सरस्वती यांचें, जों जों वृद्धीस पावलें,
सख्य तों तों आर्यमाता, हळूहळुच पावलें
॥ १० ॥
टाकी देशोन्नतीसाठीं एकेक दिन जो चढे,
कैसा सफल हा झाला, प्रवास कथितों पुढें
॥ ११ ॥

( पुढें चालू. )

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत रा० रा० खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख १९ माहे जुलै सन १८८० इसवी. अंक २८


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## नोटिसा.

त्रिंबका वल्लद बनशी आपा मिठकरी वाणी रहाणार खामगाव महजदी जवळ अप्याचे कोठींत यास मंजी मर्द त्रिंबका वाणी इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुझ्याशी माझें लग्न झाल्यास १०।११ वर्षें झालीं. हल्लीं ९ वर्षें झालीं मला पदर आला आहे. पण दुर्दैवानें तूं माणमांत खोटा ठरलास त्यास उपाय नाहीं. च्यार चौघा मंडळींनीं कसबीण आणूनही तुझी परीक्षा केली. १० रुपये खर्च केला पण त्यांत तूं नपुंसक ठरलास असें त्या कसबिणीनेंही सर्वांस सांगितलें त्या दिवसांपासून माझा बाप तुला फारकत देण्यास सांगत असतां व होय देतो असें तूं ह्मणत ह्मसतां इतकीं वर्षें चाल ढकलीवर टाकल्येस तेणेंकरून माझे संसाराचा खराबा होत आहे. देवाचे दयेनें आपले जातींत गंधर्वाची सोय आहे व दुसरेकडूनही माझे बापाचा आप्त तूं आहेस ह्मणून दिवाणदरबार न करितां आपसांत सोडचिठी दावी हें योग्य आहे व त्या करितां ही तुला नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत तूं सोडचिठी देऊन मोकळें व्हावेस व मला रस्ता करून द्यावा तसें न केल्यास मी कोर्टांत दावा करून तुझा लग्नाचा हक्क रद्द करीन व त्याजबद्दल खर्च येईलतो व या नोटिशीचा खर्च झाला आहे हा तुला भरून द्यावा लागेले. याचा दूरवर विचार करावा व कोणाचे नादीं नें लागतां सोडचिठी द्यावी यांत तुझा कायदा व अब्रूचा बचाव आहे. इतक्या उपर तुझी मर्जी. कळावें तारीख १७ माहे जुलै सन १८८० इसवी.

( सही ची ) बांगडी मंजाई इचे हातची.

नोटिस.

जान्या वल्लद रतीराम टकारी रहाणार वणी तालुके अकोला जिल्हे मजकूर यास खालीं सही करणार प्रेमसुक मारवाडी रहाणार बोरगाव ( मंजू ) तालुके अकोला यजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे तुझ्याकडे सवाशें रुपये असून त्याचा स्टांप कागदावर पुर्जा आहे. त्यांत वसूल बैलाची जोडी एक रुपये ४१ची, सर्वे नंबर ३चें शेत रुपये ८० चें खरीद दिलें; परंतु त्याचें खरीदखत अजूम आह्मास नोंदून दिलें नाहीं व राहिलेल्या बाकीचाही पुरजा अजून दिला नाहीं. करितां ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत खरीदखताचा नोंदलेला दस्तैवज व राहिलेल्या बाकीचा पुरजा आणून द्यावा. न दिल्यास कोर्टांतून फिर्याद करून वायद्याचे रुपये, व्याजाचे रुपये व खरीदखताचा नोंदलेला दस्तैवज घेतला जाईल. कोर्टखर्च व या नोटिशीचा खर्च तुह्मावर बसेल हें खूप समजावें. कळावें. तारीख १७ जुलै सन १८८० इसवी.

( सही ) प्रेमसुक मारवाडी रहाणार बोरगाव तालुके अकोलें दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकुर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

ता. ७ माहे जुलै सन १८८० इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि.— रा. रा. नरसप्या चीफकान्स्टेबल. तेल्हारें यांची बदली अकोला टाउन चिफाचे जागीं झाली. हें वर्तमान आपले एका पत्रांत छापलें होतें. तरी नरसप्या यांचे बदलीच्या वियोगजन्य दुःखानें येथील बहुत प्राप्स्य मंडळीस व विशेषें त्यांचे स्नेहीवर्गास बहुत दुःख झालें. कारण येथें हे अशा जबाबदारीच्या हुद्यावर सुमारें १०।११ वर्षें होते व तितके काळांत यांनीं लहान मोठ्यांस आनंदित ठेवून सरकारी काम फार नेकीनें, झटून व वरिष्ठांची मर्जी संपादून केलें यांत संशय नाहीं. जाते समयीं यांस शाळेंत पानसुपारीस बोलाविलें असतां येथील माजी पोष्टमास्तर रा. रा. श्रीधर गोविंद यांनीं शाळेस, घड्याळ, घंटा, कसरतीचें सामान, मुलांस बसण्यास तरटपाट, वगैरे ज्या गोष्टी उण्या आहेत त्या वर्गणीद्वारां पुऱ्या व्हाव्या ह्मणून रा. रा. नरसप्या व रा रा. मनाबापू देशमूख व शेट सावकार साहू व इतर सभ्य गृहस्थांस सुचविल्या वरून त्या सर्वांस ती गोष्ट पसंत पडून त्यांनीं लागलीच एक वर्गणीची यादी तयार केली. व तींत सुमारें ६९ रुपयांचे आंकडे पडले. त्यांत देशमुखांनीं १९ रु व चीफ साहेबांनीं ५ रु. घातले आहेत. तीन तीन रुपयांचे ३ इसम, दोन दोन रुपयांचे ९ इसम व एक रुपयावाले १८ आहेत. यांतील बरीच वर्गणी वसूल आली. १८।२० रु. येणें आहेत ते ते लवकर देतील अशी उमेद आहे व मनाजी देशमुख घड्याळ देणार आहेत तेही लवकर देतील. रा. रा. अमृतराव देशमुख यांनीं दोन रुपये वर्गणी शिवाय दोन अडिच रुपये किमतीचें स्टूल अगर खुर्ची कोणीही व्हिजिटर प्रसंगोपात येतात त्यांस बसण्यास नाहीं एतदर्थ देण्याचें कबूल केलें आहे. एकंदरींत येथील ग्रामस्थांनीं साल गुदस्तां ज्या प्रमाणें शाळागृहा प्रीत्यर्थ १००० रु. वर्गणी जमवून आपला उदार आश्रय दर्शविला तसा आतांही देऊन सर्व राहिलेली वर्गणी आणून सत्वर हजर करतीलच कळावें.

एक तेल्हारेकर

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. या मध्य प्रदेशांत नागपुर, भंडारा, व शिवणी या जिल्ह्यांत गौडी धर्मीची एक जात आहे व त्यांचे जातींत गोंड व परधान या दोन जाती मुकर आहेत या उभय जातींचे धर्माचरण एकसारखें असून इष्टदेवही दोघांचा एकच आहे. परंतु खाणें पिणें व लग्नसंबंध एकवट एकमेकांचा नाहीं याजकारितां विनंती करितों कीं, या अद्वितीय जातीची मूळ उत्पत्ती कोठून व कधींपासून झाली असावी याचा पूर्णपणें शोध कोणी एखादे ग्रंथाचे आधारें करून त्याजबद्दल एक अलाहिदा पुस्तक आपले मतीनुसार तयार करून छापविल्यास त्याचे किमतीबद्दल जो खर्च पडेल तो आह्मी रवाना करून पुस्तक जरूर घेऊ. आह्मांस या पुस्तकाची फारच जरूरी आहे. ही विनंती तारीख ७ माहे जुलै सन १८८० इसवी.

दवलतराम मोकासी जमीदार
तालुके गंगझरी तरोडा
जिल्हे भंडारा.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः....

वि. वि. मोपच्या डाक्याविषयीं—जे लोक मोगलाईंत धरले ते वाशिमास रवाना झाले. पातरीचा डाकेवाला मारवाडी ब्राह्मण व आणखी चार इसम सापडले नाहींत. त्यांचा तपास चालला आहे. सापडलेल्या लोकांस काय शिक्षा होते पाहू. त्या लोकांपाशीं माल, हत्यारें वगैरे कांहीं मिळाले नाहीं. ते लोक कोणीं जंगलांत, कोणी तुळजापुरापावेतों पळून गेले होते. असें ऐकतों कीं, तेथील पाटलानें ४ इसम धरून दिले. ३ इसम रिझर्व वाशिम एथील शिपायांनीं धरिले त्याचें त्यांस सरकार देवो.

दत्तविधान—थोडे दिवसांपूर्वीं कसबे वाकद तालुके वाशिम एथील मानकरी देशमुख कुशाजी हे परलोकवासी झाले त्यांचे पोटीं पुत्र संतान नव्हते ह्मणून त्यांचे पत्नीनें गंभीरराव देशमुख यांचा मुलगा दत्तक घेतला. हा मुलगा हुशार असून सरकारी शाळेंत अभ्यास करीत आहे. त्याचें नाव रजिस्टरांत दाखल होऊन त्यास रुतूम मिळणार असें ऐकतों. दत्तविधानाचे समयीं बडे लोकांचा बराच समाज मिळाला होता. त्यांस अहेर व अन्नखर्च मिळून २००० रुपये खर्च झाला असावा. दत्तविधान न व्हावें ह्मणून विघ्नें आलीं होतीं त्याबद्दल वर्तमान कळल्यावर विदित करीन.

पांडे लोक—अलिशान रेसिडेंट साहेब बहादूर यांचे सर्क्युलराप्रमाणें पांडे लोकांनीं आपआपले गावीं रहाण्याची अमलबारी चालली आहे. ह्या अमलबारीपासून बरेच लोकांचे गैरफायदे झाले आहेत. बिचारे पांडे मोठ्या लाचारीनें हुकुमास उजूर येऊं नये ह्मणून आपल्या इमारती, खटलें, इस्टेट सोडून चालले आहेत व खर्च करून खेड्यावर घरें बांधित आहेत. विशेषेंकरून गुमास्तेपांडे आहेत त्यांजला मोठी काळजी आहे ती अशी कीं, मालकास जो पैसा मिळेल त्याचा अर्धा द्यावा लागतो. बाकी पैशांत त्यांचा चरितार्थ होणें कठीण पडतें. खेड्यावर खर्च करून घर बांधिलें. नंतर मालकानें आपलें गाव घेतलें ह्मणजे "नाग्या नागवला व तु क्या उजवला." या ह्मणीप्रमाणें होईल. त्या सर्क्युलरांत अशी सूचना आहे कीं, अधिक गावें असल्यास आठवड्यांतून ३ वेळां गावीं जात जावें. ही अमलबारी सरकारानें केली तर गरीब पांडे लोकांच्या अडचणी व नुकसान होणार नाहीं असें सरकारापाशी मागणें आहे.

किरकोळ—सुमार ८ महिन्यांपासून तासगावकर स्त्रीमिश्रित नाटक वाशिम जिल्ह्यांत आलें आहे. त्यांत सुमार २५ मनुष्यें असून ८ मनुष्यें आपल्या पात्रांचें काम करी करितात. स्त्रिया दोघी ब्राह्मणांच्या व एक शूद्राची अशा तिघी होत्या. त्या वाशिम मुक्कामीं कोणीं फितवून नेल्या. हल्लीं त्या नाटकांत बायका नाहींत. त्या गेल्यापासून नाटकाचें तेज गेल्यासारखें झालें आहे. हल्लीं ते रिसोडास आहेत. चार महिने तेथेंच रहाण्याचा त्यांचा मानस दिसतो; परंतु पदरमोड खावी लागती. पाऊस पडून पेरण्या चालू आहेत. रोगराई कांहीं नाहीं. धान्याच्या भावांत फरक नाहीं. कळावें. ता. ७ माहे जुलै १८८०.

एक क्ष.

वऱ्हाडसमाचार.

मिति आषाढ शुद्ध १२ शके १८०२

# हिंदुस्थानांत मोठें अर्पाल कोर्ट होण्याची वाटाघाट.

आजपर्यंत हायकोर्टावर व हिंदुस्थान सरकारच्या ठरावावर जीं अपिलें होतात तीं विलायतेंस प्रिव्हि कौन्सिलकडे होण्याची वहिवाट आहे. तिकडे कागद पत्रांचे दाखले इकडील सरकारी कामदार मार्फत जाऊन त्यावर निर्णय होत असतो. त्यामुळे चांगला इनसाफ होत नाहीं. सरकारी कामदारावर अपील आणि त्याची माहिती न्याय कोर्टास त्यांनेंच कळविली व साक्षी वगैरे कांहीं झालें नाही ह्मणजे जरा तरफदारीचा ठराव होण्याचा संभव आहे असें विलायतेंतील हितेच्छु लोकांस वारंवार वाटतें व ते त्याविषयीं प्रयत्न करितात. हल्लीं नुकतेंच विलायेंतत ईस्टइंडिया असोसियेशन सभेपुढें लार्ड स्प्यानली साहेबानीं या विषयावर कांहीं कागद वाचिले. त्यांत त्यांनीं लिहिलें आहे कीं अशीं अपिलें विलायेंतस प्रिव्ही कौंसलच्या जुडिशियल कमेटीपुढें जाणें त्रासकारक, गैरसाईचें व खर्चाचेंही आहे. आणि हिंदुस्थानांत असें अपील कोर्ट नसल्यानें पुष्कळ अन्याय होतो. हिंदुस्थान देश जसा इंग्रज सरकारचा मुलुख आहे तसा अमेरिकेंत कानडा देश इंग्रज सरकारचे ताब्यांत आहे व तेथें असें अपील कोर्ट सरकारानें ठेविलें आहे. त्याच पद्धतीवर हिंदुस्थानांत ठेवावें, असें लार्ड साहेबांचें ह्मणणें आहे. अपील कोर्टांची संख्या वाढविण्याकरितां हें एक अधिक कोर्ट करावयाचें असें नाहीं. या कोर्टाकडे अपील केल्यास तेंच शेवटचें असावें आणि या कोर्टाकडे न जातां प्रिव्हि कौन्सिलकडे कोणी अपील नेईल तर ती त्याची मुखत्यारी आहे, प्रिव्हि कौन्सलचे तंटे हिंदुस्थान सरकार मार्फत जातात तशी या कोर्टाच्या अपिलास मार्फत नको. व हें कोर्ट हिंदुस्थानांत स्थापन व्हावें असें त्यांचें ह्मणणें आहे.

राजे व संस्थानिक लोक यांचे वारसाचे संबंधानें वाद पडतात, राजांवर आरोप येतात, नेटिव संस्थानें व इंग्लिश राज्य यांच्या हद्दीचे तंटे निर्माण होतात, तहनाम्यांतील कांहीं अटीवर तक्रारी निघून त्यांवर वाट चालतो, या सर्व गोष्टीच निर्णय हिंदुस्थानच्याच अपील कोर्टांत झाले पाहिजेत असेंच केवळ नाहीं, पण कांहींचे फैसल झाले व कांहीं बाबद्दीत या कोर्टाचे अभिप्राय मागविले तर चांगलें होईल. असें स्वतंत्र कोर्ट टांकचा नबाब व बडोद्याचे श्री० मल्हारव यांचे व दुसरे असेच कित्येकांचे प्रकरणांत अवश्य पाहिजे होतें असें लार्ड स्प्यानली साहेबांचें मत आहे. असें कायमचे मोठें कोर्ट नसून समय विशेषीं सामान्य कामदार पाठवून किंवा जून कमिशन मेमून पोलिटिकल अधिकारी माहिती मिळवितात ती अपुरी असते व तिच्या धोरणावर न्याय होतो तो बरोबर नाहीं असेंही ते ह्मणतात. व त्याचे प्रत्यंतरास कित्येक गोष्टी त्यानीं सांगितल्या आहेत. त्यांतील पाल्हिठाण्याचे ठाकुराची एक हकीकत आहे ती तर फारच चमत्कारिक आहे ती आह्मी पुढील अंकांत वाचकांस कळवूं. तथापि आज लार्ड स्प्यानली साहेबांचे मताचे संबंधानें इतकेंच सांगतो कीं सदरहु प्रकारचें कोर्ट हिंदुस्थानांत स्थापन होणें फार अवश्य आहे. व विलायत सरकार त्याविषयीं अवश्य विचार करील.

---

नाटकी न नाभाईचे प्रताप.

मुंबईचे मि. नानाभाई गणपतराव धैर्यवान येथें प्रसिद्धीस आलेले नाटकवाले यानीं मुंबईस आपले श्वशुर रा. ब. जनार्दन वासुदेवजी यांचे घरी गेले बुधवारीं सोन्या रुप्याचे दागिने वगैरे मिळून ३२२५० रुपयांची चोरी केली असें प्रसिद्ध झालें आहे. व त्यांस पकडण्या करितां इंदुरास वारंट गेलें आहे. त्यांचे बंधु मि. बाळजी यांस मदतगार ह्मणून कैद केले आहे मारवाडी व सराफ यांकडे चोरी केल्या पैकीं गहाण ठेविलेले कांहीं दागिने पोलिसानें पकडले आहेत. व बाकीच्यांचा तपास चालू आहे वा :! आमचे नानाजी व बाळजी यानीं घरच्या पैशावर चैनी केल्या व पैसे सरले ह्मणून चौर्य कर्म आरंभिलें होतें काय? पण मुदत संपली, ह्मणजे पापाचा घडा भरला तेव्हां ती चैन सोडून दुसऱ्या शृंखलाविभूषित चैनीस आतां ते सज्ज झाले असें वाटतें! अरेरे! यावरून एवढेंच लक्षांत ठेवावयाचें कीं अति उन्मत्तता ईश्वरास सहन होत नाहीं! बिचारे निरपराधी असले तर सुटोत !

---

युरोपियन अपराध्यास फाशीची शिक्षा.

कलकत्यास जार्ज नेर्न नावाचा युरोपियन खलाशी नोकरीची चुकामूक होऊन फिरत असतां त्यानें गुलामखान नावाच्या पोलिस शिपायास माहिती विचारली त्यास त्याची भाषा न समजल्यामुळें त्यानें कांहीं सांगितलें नाहीं, त्यावरून त्या शिपायास त्यानें खालीं पाडून सुरीनें त्याची मान कापिली. या अपराधाबद्दल त्यास फाशीची शिक्षा झाली !

---

The Bombay Samachar, a daily Guzerathi Journal published at Bombay, has a very flattering account, in the issue of 8th instant of Mr. W. B. Jones, Revenue Commissioner Berar, contributed by a Correspondent in Guzerathi. We take the liberty to place before ourreaders a free translation of that part of the paragraph which refers to him:—

The Commissioner Mr. Jones has made himself famous in Berar. His physical appearance is a contrast to his literary abilities ( he being a Barister-at-law), his virtues are sterling worth. foremost among them being prudence and a keen sagaciousness in the discharge of his duties. His natural disposition leading him to prefer hard work combined with a degree of self-reliance in the investigation of matters of moment. He expects that his subordinates should work hard while he recognizes aptly good work done by them. His observant mood often leads him to indulge in the enjoyment of a pedestrian life. while his conveyance follows him. He has frequently walked through lanes in the interests of sanitation. His plain exterior in apparel has often been visited by neglect of that courteousness, which is his due, and to which he is not a whit attached. He is not at all influenced by recommendatory letters, his sole aim being to reward merit. Petitioners have free access to him and complaints have a thorough investigation; and impartial and just award given. His subordinates are always treated with a marked kindness notwithstanding his apparently reserved habits

---

We regret to see that Major Thomson of the Buldana District has been maliciously and grossly maligned by the Editor of the *Urdu Akhbar* who states that ever since that officer's appointment to the Court at Malkapur he has been holding his Cutchery at Buldana, and that he neglects the work of his court. Now the real facts of the case are these:-Since the middle of October last, with the exception of a few weeks when he was superintending the fair at Deolgaum Rajah, Major Thomson has been continually either in the Malkapur Talook or at Malkapur itself until the beginning of April, when in consequence of his officiating for Colonel Bushby, for three months, his Court was necessarily closed. He is now permitted to hold his court at head quarters during the rains, but this cannot cause inconvenience, because, as Buldana borders on the Malkapur Talook, nearly half of that Talook is nearer to Buldana than to Malkapur.

As regards the charge against this officer of neglecting the work of his court, the mis-statement is if possible still more glaring, for if the Judicial Commissioner's last printed quarterly statment of civil work performed by each officer be referred to, it will be seen that Major Thompson disposed of more than three times as many civil suits as all the remaining European Assistant Commissioners of the province put together; and also, during the same time, disposed of nearly double the number of miscellaneous cases of all these officers put together.

The slanderous attacks of this paper, have become a perfect nuisance and we regret that the only return this Editor is willing to render for the education received by him from a beneficent and indulgent Government is maliciously to slander and defame its officers.

---

When we characterised the writings of the *Urdu Akhbar* as frivolous effusions in our last issue we did not expect that the Editor would come forward so promptly to supply the proof of what we said. In his last article in connection with the subject of the appointment in the Government Book Depot, the Editor has not only failed to proveany of his statements but has filled some columns of his paper with irrelevant personalities and incoherent jargon.

Our readers will recollect that the Editor asserted in his first article on the subject ( 1 ) that in appointing Gopal Vishwanath the Director "crossed the limits of the Resident's Book Circular," [ 2 ] that the Rao Bahadur told some Matriculated and other candidates that the place was not to be filled up, and [ 3 ] that the successful candidate was recommended by a close relation of the Director.

Rao Bahadoor Dandeker has declared all these statements to be 'mischievously false' and the most audacious and defamatory falsehood that Gopal had been recommended by a relation of the Director is withdrawn by the Editor himself The writer says—

"We had our own doubts about this "statement and therefore to get out the "pith ofthe popular rumour we gave "publicity to it in such a way as would "not hold us responsible for its truth."

This passage will speak for itself. It shows that the Editor was base enough to insinuate an unfounded imputation against a most worthy officer but was too cowardly to take the responsibility of the statement upon himself. He falsely characterises his invented statement as the "pith of the popular rumour" which existed only in his imagination and had been heard by nobody before the *Urdu Akhbar* of the 3rd instant was published

In support of the statement that in appointing the man the Resident's orders were disregarded all that the Editor has said is that

"He( Gopal ) cannot be able to "prove that he has lived in Berar for more than four years continuously"

Now the Resident's orders on the point are clear and are as follow:

"2 Accordingly, it is hereby directed "that no person shall, without the special sanctionof the Commissioner or Resident, be appointed toany Government office in Berar unless he be Native of "or shall have resided continuously for a term of at least three years in the Province."

It will thus be seen that neither the letter nor the spirit of the Resident's instructions has been violated by the Director. As regards the remaining statement, the Editor confesses that " he cannot *vouchsafe* its accuracy" It will thus appear that the falsity of the main statements has not only been declared by the Director but proved out of the Editor's own mouth.

The Editor still shamelessly persists in the reckless assertion that the circular was disregarded by the Director but we need say nothing more on the point as all the facts are now before the public.

Gopal Vishwanath was considered by the Director fit to hold the Karkoonship temporarily but the Editor of the *Urdu Ahkbar* does not think so! He considers himself to be a better judge than the Rao Bahadur in these matters!! We do not know which to admire most, —— the self-complacent vanity of the writer, his audacity in venturing to publish extravagant assertions, or his boundless confidence in the readiness of his readers to swallow the most worthless gibberish.

We hope that we shall not be compelled take up this subject again. We said in our last issue that the effusions of our contemporary were beneath notice; and we regretted that the Director should have condescended to notice them. We are still of the same opinion; but as the Director considered it necessary to notice the subject, we were compelled to place all the facts before our readers. We are also bound to abide by the opinions of our readers, some of whom think that as long as the productions of the fertile imagination of an unscrupulous writer consist in harmless falsehoods such as the Description of the Distribution of Prizes by the Resident in the Amraoti High school, the overflowing of the river at Yalla, the transfer of the Berar Administration to the Government of Bombay &c. &c. (for which there was not the least foundation). nobody would take the trouble of noticing them; but when an insignificant temporary appointment made in ordinary course of business by a high officer of Government, whose justice and impartiality are well known is maliciously criticised, and a tissue of falsehoods set forth with unequalled audacity, it is but just that all the facts should be placed before the people.

We need hardly say that we are not blind admirers of the present Director of Public Instruction. We do not apprve of his policy in all its details and we never said that his administration was altogether faultless; but that is no reason why we should withhold from him credit for strict justice and thorough impartiality which characterise the management of his Department, and allow him to be defamed with impunity by a writer whose applications for appointments in the Department he considered it his duty to reject on some occasions.

---

It has often occurred to us that the Residency Orders, publishing so much of antiquated intelligence and so little of fresh items, loses much. News already too well known, notifications which have appeared in the Government Gazette reproduced after a fortnight or later, leaves already granted and which have been availed of perhaps a month previous to issue of the Residency Orders find a record in it. Perhaps the issue being bi-monthly, there is no remedy. The last issue of the Residency Orders contains a statement of births & deaths for the month of March last, submitted in June and published in July! The interest which this statement naturally evokes is immeasurably lost to the public, by the lateness of publication. It comes to us as an echo from the grave calling up reminiscences of the past. The "Central, Provinces Gazette" is usually watched by the public, with an unfeigned interest; for instead of adopting the usual monotonous official stereotyped medium of communicating orders, it conveys instructions which necessitate being carried out after publication. It is the very reverse with the Residency Orders, for orders are issued and carried out; and when the occurrence is forgotten, they figure in the Residency Orders by way of a forget-me-not. There are numerous difficulties for it to contend with, no doubt. The vast chasm that separates the Berars from its Head quarters (for verily Hyderabad is its Head quarters) is one of the many obstacles in maintaining that rapid communication which it is expected to possess. The issue being constituted a bi-monthly instead of a weekly is another of the obstacles. We might enumerate these *ad libitum*, but the instances advanced suffice to show the chief obstacles which ought and can be wiped away. The latter can be remedied without much ado. The former will require a little diplomatic negotiation which will, when successful, render immense good to the public. The alternative is to construct a branch state railway from Akola *Via* Bassim, Nandeir, Kowlass and Secunderabad. The distance at the utmost will not exceed 200 miles. The vast gulf now apparent will be spanned by this means of communication. The Nizam's Government will be benefited by the introduction of this offspring of civilization. Trade will revive; and justice will be nearer approach than it is at present. Troops can be ordered in and out at a moment's notice; a week's absence from Hyderabad will suffice the Resident to inspect his valuable charge (Berar). The resulting benefits it is needless further to dilate. Sufficient that it is not simply for the comparatively insignificant benefit contemplated for the improvement of the official organ. The distance from Akola to Hyderabad by the G. I. P. line is something like 700 miles. The branch line advocated will curtail this distance by 500 miles.

---

## वऱ्हाड.

जु० कमिशनर साहेब उद्या उमरावतीस जातील. कारण परवा तेथें सेशन आहे.

जुडिशियल कमिशनर साहेबाचे डिपुटी क्लार्कचे जागेवर आह्मी शिफारस केल्याप्रमाणें कर्नल बेल साहेब यानीं रा. रा. यशवंत महादेव यांसच नेमिलें असें वाटतें. सदहू गृहस्थ जु० क० आफिसांत रुजू होण्याकरितां आजच एथें आले.

मे० ग्रांट साहेब इन्स्पेक्टर जनरल यांची स्वारी येथें आली आहे.

मि० किट्स साहेब येथील असिस्टंट कमिशनर यांस उमरावतीस स्मालकाज जडज नेमिलें व ते तिकडे जाऊन रुजू झाले. येथें त्यांचे जागयावर यवतमाळाहून मि० इलियट साहेब यांस नेमिलें आहे.

मि० डनलप साहेब खामगावचे स्मालकाज जडज यांस खानेसुमारीचे कमिशनर नेमिलें आहे. व ते तिकडील काम पाहूं लागले ह्मणजे मि० हेर साहेब खामगावास जातील असें ह्मणतात.

सार्जंट म्याकिंटाश बुलढाण्याचे सेकंड ग्रेड सुपरवायझर १९ वे तारखेस मरण पावले.

बाळापुरचे नायब तहाशिलदार रा. रा. गंगाराम बापुजी यांनीं पेनशनाचा अर्ज केला व त्यांचे जागेवर असिस्टंट कमिशनरचे शिरस्तेदार रा. रा. विठूजी नारायण यांस नेमिलें. हे ग्रहस्थ मास्तर होते. व यांच्या अंगच्या हुशारीवरून मे. बुलक साहेबांनीं यांस रिविन्यू खात्यांत नुकतेंच घेतलें असतां इकडेही हे चलाख ठरून लवकरच पेशकार झाले याजबद्दल आह्मास संतोष वाटतो.

मेजर हडलस्टन साहेब फर्स्ट क्लास डिपुटी कमिशनर यांनीं राजिनामा दिला त्यावरून हिंदुस्थान सरकारानें वर्गावर्गी करून इंडिया ग्याझेटमध्यें प्रसिद्ध केली ती अशी:--

कर्नल बुशबी साहेब सेकंड क्लास डिपुटी कमिशनर होते ते फर्स्ट क्लास झाले मे. स्प्यान्स्की सा. थर्ड क्लास डि. कमिशनर होते ते सेकंड क्लास झाल. मे. बुलक सा. फर्स्ट असिस्टंट कमिशनर होते ते थर्ड क्लास डिपुटी कमिशनर झाले. मे. लडलो सा. सी. आय. ई. सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर होते ते फर्स्ट क्लास झाले. मि. इलियट साहेब थर्ड क्लास असि. क. होते ते सेकंड क्लास झाले. व मि. सय्यद अबदुल हक्क कर्नाळकर सबस्ट्यांटिव प्रोटेम होते ते कायम थर्ड असिस्टंट कमिशनर झाले.

एथील बेदर, महार व ढोर लोकांचे मुलांकरितां खासगी शाळा आहे. तिची व्यवस्था अधिक चांगली करण्याकरितां एक म्यानेजिंग कमिटी नेमण्याची तिचे उत्पादक रा. रा. विश्वनाथ नारायण शास्त्री यांचा विचार आ... तेथे सभा भर... ...ाची थोडी ९ वी यत्ता शिक... मुलांनीं कविता चांग... ल्या. त्यावरून त्यांच्या ... र झाला आहे असें दिसून ... हेतु, उद्योग, व पुढील फळ... लवकरच आह्मी विशेषें लिहू.

क २९

१६ जुलै १८८०.

स:—

न दिवसांपासून

? पडतो, व

शेतकरी

मेघराज

हा

ग-

खामगावास काल्च्या मागील ... चांगला पाऊस पडला. उमरावती व इ... पुर इकडेही ह्मणण्यासारखा आरंभापासून ... भाटा नाहीं. पण अकोले जिल्ह्यांत बऱ्याचे भागांत पाऊस नाहीं. शहर अकोल्याच्या जमीनांत बऱ्याच पेरण्या व्हावयाच्या शिलक आहेत व ज्या झाल्या आहेत त्या निरुपयोगी होण्याच्या बेतास आल्या आहेत. इतक्यांत मेघराज कृपा करितील तर बरें होईल. एका रविवारीं साधारण पाऊस पडला होता व ज्यावरून शेतीवाले लोकांस हुशारी आली होती त्याला आज १६ दिवस झाले. पांच मिनिटेंदेखील सारखा पाऊस त्यापुढें कधीं पडला नाहीं.

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. यांस डे. क. साहेबानीं ३९ रुपयांची रा. रा. विठुजी नारायण याची असि० च्या शिरेस्तदारीची जागा दिली. वऱ्हाडांतील हे दुसरेच बी. ए. असतां यांनां प्रथमतःच चांगली मोठी नोकरी मिळण्याचा प्रसंग आला नाहीं त्यास उपाय नाहीं, तरी सर्व प्रकारच्या कामाच माहिती होऊन पुढें उदयास येण्यास हा अल्प प्रवेश वाईट नाहीं. देशपांडे यानीं अधिकाऱ्याच्या शद्वास मान देऊन ही जागा पतकरिली हें चांगलें केलें. येणेंकरून तेच त्यांस बढती देतील. व त्यांच्या गुणांनी ती त्यांस लवकर मिळेल असें आह्मांस वाटतें.

गावाबाहेर परसाकडे जाण्याचे संबंधांत आलीकडे लोकांवर पुष्कळ मुकदमे होऊं लागले आहेत. म्युनिसिप्यालिटीची हद आलीकडे वाढून बरीच लांबलचक झाली आहे. व त्या सर्व हदीच्या आंत कोणी कोठेंही मैला केला तर त्यास धरावें असे चीफ कानस्टेबल यांस हुकूम झालेले आहेत. व म्युनिसिप्यालिटीनें ज्या लोकांच्या घरीं पायखाने नाहींत त्यांनां बाहेर जाण्याकारितां ज्या जागा मुकर केल्या आहेत त्यांविषयीं चीफ कान्स्टेबल यांस कांहीं माहिती नसून तेथें बसणाऱ्या लोकांवरही मुकदमे होत आहेत व त्यामुळें लोकांत फार त्रास झाला आहे. याविषयीं म्युनिसिप्यालिटी व डिपुटी कमिशनर साहेब मनावर घेऊन पोलिसांस नियमीत जागेवरून लोकांस धरण्याचे बाबदांत मनाईचे हुकूम देतील तर फार चांगलें होईल. म्युनिसिपालिटिनें अमुक जागेवर परसाकडे बसा ह्मणावें व पोलिसानें त्या जागेवर बसणारास धरून नेऊन त्यांवर मुकदमे करावे ह्मणजे हा विलक्षण प्रकार झाला. व ही अशी स्थिती नवापुऱ्यांतील लोकांची हल्लीं झाली आहे. व त्यांनीं त्याबद्दल म्युनिसिप्यालिटीकडे अर्ज केला आहे. काय निकाल होतो पाहावें.

पुस्तक [illegible] रास गेले आहेत [illegible] जाणार आहेत.

वऱ्हाड [illegible] िक सभेनें व कलक- [illegible] सायटीनें नवीन व्हाईस- [illegible] ले त्यांस आनंदसूचक पत्रें वर्षाचे अ [illegible] त्यांनींही त्यांस आभारदर्शक साल [illegible] लीं.

फिर [illegible] आत्माराम पांडुरंग यांचे दुसरे चि- [illegible] मि. आनंदराव हे विलायतेस वैद्यका- [illegible] अभ्यास करीत आहेत तेथें ते चांगले प्रसिद्धीस आले. त्यांस नुकतीच दोन सुवर्ण पदकें बक्षीस मिळालीं. युनिव्हर्सिटी कालेज आस्पिटलचे त्यांनां फिजिसियन नेमिलें आहे आगष्ट महिन्यांत त्यांचे अभ्यासाची परीक्षा होणार आहे.

अबदुल रहिमानची एक बायको बालाहिसार नजीक राहते तिनें आपल्या नवऱ्यास झगे वगैरे राजकीय पोशाग पाठविले. त्या थाटानें त्यानें काबुलांत यावें असें ती चाहते.

हिंदुस्थानांतील लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकण्याकरितां एक अपिलें कोर्ट येथेंच ठेवावें अशी लार्डर स्यानली यांनीं सूचना केली आहे. या कोर्टांत ५ कमिशनर असावे व त्यांमध्यें कांहीं अनुभविक जडज असावे.

हौस आफ कामन्सकरितां १५ लक्ष रुपयांची एक नवीन इमारत बांधण्याचा विचार आहे.

विलायतेंत इंडिया कौन्सिल मधील २ मेंबर सर अर्स्किन पेरी व सर राबर्ट मांटगोमरी पेनशन घेणार आहेत.

हुबळीहून कारवाडास रेल्वे नेण्याचा विचार होता तो रहित होऊन गोव्यावर रेल्वे नेण्याचा विचार झाला आहे; परंतु तो तसा होऊनये व पहिला बेत कायम ठेवावा अशा बद्दल कारवाडच्या लोकांनीं सरकारास अर्ज केला आहे.

त्रावणकोरच्या राज्याची गुदस्तसालची जमाबंदी १७,१०,३८ रुपये झाली.

कलकत्याच्या व्हालंटियर पलटणीचे कर्नल होण्याचे व्हाईसराय साहेबांनीं कबुल केलें. मुंबईचे गव्हरनरांनीं मुंबई व्हालंटियरचें कर्नल होण्याचें कबूल केलें नाहीं.

पैमाष खात्याकडील मि० जे एफ ब्यानेस यानीं उत्तम व पूर्ण माहिती मिळवून हिंदुस्थानचें ग्याझिटियर नवीन तयार केलें अहे व तें मेसर्स न्यूमन आणि कंपनी या पावसाळ्यांत छापणार आहे.

मुसलमान जातीच्या स्त्रीला नवऱ्यानें सोडल्यास तिनें ९० वर्षें वाट पाहून नंतर दुसरें लग्न करावें असें मुसलमानी शास्त्रांत असल्या विषयीं कलकत्याच्या एका कोर्टांत आक्षेप निघाला होता. न्यायाधीश ह्मणाले ९० वर्षां नंतर आपलें लग्न करून घेणारी तरुण स्त्री आढळेल हें मनांत सुद्धा आणतां येत नाहि!

नगरच्या वक्तृत्व सभेस या साली ४ विषय नेमिले आहेत १ मोगलाई व पेशवाई अमलांतील दराची व वसुलाची रीत आणि हल्लींची रीत यांतील फरक. २ कायदे कौन्सलर यास अवश्य माहिती कोणती पाहिजे ३ भिक्षेकऱ्यास उद्योगास लावण्याचे उपाय. आणी ४ सत्संगतीपासून लाभ.

नवानगरास हल्लीं जे नवीन दिवाण झाले त्यांनीं पुढील चार वर्षांचा पगार सरकारापासून अगाऊ घेतला आहे.

सन १८७७ सालीं दिल्लीकॉलेज बंद झालें तें पुन्हा सरकारानें सुरू करावें अशी खटपट तेथील लोकांनीं चालविली आहे. एक डेप्युटेशन व्हाइसराय साहेबाकडे पाठविलें त्यांत ७ गृहस्थ आहेत व प्रमुख मिरजासुलेमानशा दिल्लीच्या बादशहाचे वंशज आहेत. वर्गणीचे आकडे ५०००० पर्यंत जमले आहेत. २ लक्ष रुपये जमल्यास सरकार महिना १००० रुपये देईल असें ह्मणतात.

मुंबईचे मि० कुवरजी सोराबजी नाजीर नावाचे पारशी गृहस्थांनीं गेईटी थियेटर नावाचें एक मोठें भव्य नाटकगृह करून विलायतेहून नाटकवाले आणवून मोठा व्यवसाय केला होता पण त्यांत त्यांस तोटा झाझाला. व आतां त्यांवर फिर्यादी वगैरे झाल्या आहेत.

पंजाबांत रवी, चिनाब, आणि जाहिलम या नद्यांनां पूर येऊन मोठा ल्गराबा झाला. लाहोरपासून वजिराबादपर्यंत रस्ता बहुतेक ठिकाणीं जलमय आहे. जलंदर शहर अर्धें पाण्यांत आहे.

काबुलाकडील सिबी रेल्वेचा रस्ता ४० मैल पुरानें वाहून गेला त्यामुळें पलटणीची रहदारी बंद झाली आहे.

सर स्टुअर्ट बेली यांस असामचे चीफ कमिशनर नेमिलें व मि० बर्नार्ड यांस होम डिपार्टमेंटचे सेक्रटरी कायम केलें.

काजीच्या नेमणुकीचा कायदा व सक्तीनें देवी काढण्याचा कायदा हिं० सरकारचे कायदे कौन्सिलांत मंजूर झाले.

तुर्कस्थान व ग्रीस यांजमध्यें लढाई होण्याची तयारी आहे.

चीन देशानें लढाई करून रशियाचा पराभव केला ही बातमी खरी नाहीं असें विलायतेंत ह्मणतात.

तुर्कस्थानानें युद्धप्रधान उस्मन पाच्छा होते त्यांस काढून हसन हसनी यांस त्या जागेवर नेमिलें.

कोलापुरचे महाराज पुण्यास आले आहेत. त्यांची प्रकृती अजून कोलापुरास जाण्याजोगी झाली नाहीं. तेथेंच कांहीं दिवस ठेवून त्यांकडून अभ्यास करविण्याचा विचार आहे.

याकुबखान यास येत्या हिवाळ्यांत मसुरी येथून नेऊन देहरा एथें ठेवणार.

गुदस्त सालीं मुंबई बंदराहून विलायत वगैरे ठिकाणीं कापसाचे गड्ढे ८३७७८० गेले. त्यांची सरासरी किंमत दर गठ्यास ११० रुपये धरिली ह्मणजे ९ कोट रुपयांचा कापूस बाहेर गेला असें होतें.

लार्ड रिपन व्हाईसराय साहेब यांनीं कलकत्याच्या झुलाजिकल बागेला १००० रुपये दिले.

काठेवाडांतील गोंडळ संस्थानांतील हिंदु जातीची एक तरुण स्त्री अमदाबादच्या बायकांच्या ट्रेनिंग कालेजांत स्वतांच्या खर्चानें शिकावयास येऊन राहिली आहे.

मागील पंन्नास वर्षांच्या हिशेबावरून असे कळतें कीं अमेरिकेंत एक कोट मनुष्यें बाहेर देशाहून गेलीं.

मद्रास रेल्वेकडे लोकल ट्रेनच्या तिसऱ्या क्लासात मैलो २ पई दर ठेविला आहे त्याचा परिणाम इतका चांगला झाला आहे कीं, त्या कंपनीनें आतां मेल ट्रेनच्याही तिसऱ्या क्लासाला तोच दर ठेवण्याचा निश्चय केला. आमची जी आय पी कंपनी इकडे लक्ष्य देईल काय?

ड्यूक आफ बाकिंगहाम मद्रासचे गवरनर या साल अखेरच्या पूर्वीच नोकरी सोडून स्वदेशीं जाणार. त्यांच्या जागेवर कित्येकांच्या नेमणुकी विषयीं नांवें निघालीं पण अजून कोणा विषयीं तथ्य वर्तमान नाहीं. तेथें लेफटिनंट गवरनर नेमतील असेंही ह्मणतात.

---

## लक्ष्मीसरस्वतीचारित्र.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक व० ति०

विद्या कळा सकळ चंद्रकलांसमान ।
वृद्धीस पावति अति त्वरित भ्रमा न ॥
थारा मिळे जगतिमाजि कुठें रहाया ।
सूर्याघरीं वदति कोण तमा रहा या ॥१२॥

शा० वि०

शास्त्रें पक्वदशेस पावति तशीं
काव्यें तथा नाटकें ।
टीकाकारपरिश्रमास्तव अति
क्लिष्टार्थही नाटके ॥
तैसे ते इतिहास हांसविति-त्या
कादंबऱ्या जन्मती ।
वर्णूं कोठवरी अगाध रचना
कीं खुंटती मन्मती ॥ १३ ॥
भाषा 'संस्कृत' नाम धारण करी
पावे प्रगल्भा दशा ।
सामासांत पदां करी अगणितां
नाहीं तुळा या यशा ॥
अर्थातें कठिणांहि संम्यक् रची
नायास कांहीं घडे ॥
भाषा अन्य समस्त तुच्छ गमती
सिंहीपुढें माकडें ॥ १४ ॥

इंद्रव.

भाषाख्य सिंधूतिल दिव्य रत्नें ।
असंख्य काढोनि कवींद्र यत्नें ॥
या आर्य मातेप्रति आदरानें ।
समर्पिती शोभविताच माने ॥ १५ ॥

मालिनी.

किति तरि यश वानूं या अनेकां कवींचें ।
तुळिन ह्मणुं तरी तें पारडें तागडीचें ॥
सकळहि कवि अन्या देशिंचे घातल्यानें ।
रतिभरहि न हाले जानुनें दाविल्यानें ॥१६॥

पृथ्वी.

सरस्वति अशापरि प्रकटवि स्वतेजा जरी ॥
विषादकिमपी धरी न मनि लक्ष्मि मानी तरी
तिचे भजक ते इच्या अनुजना प्रति प्रीतिनें।
सदा भजति कांपती बहुत शापितां भीतिनें
॥ १७ ॥
इचे भजक ते तिच्या अनुजना दया दाविती
तयां सदुपदेश तो कथिति लोकरीति स्थिती
करूनि बहु आशिही सतत देति उत्तेजना
स्वदेशहित चिंतनीं उचित रीति हे सज्जना
॥ १८ ॥
अशी दृढतमा तदा अखिल एकनिष्ठात्मता
करी विफल उद्यमा सकल शत्रुच्या हृद्गता
यशध्वज उभारि तो गगन चुंबण्या धाव घे
बघोनि मुखें घालिती अरि करांगुळी आवघे
॥ १९ ॥

( पुढें चालू. )

## नोटिस

चंदू वल्लद जयराम पाटील मौजे शिरलें अंधाऱ्याचें तालुके बाळापूर यास शिवाजी इंद्राजी पाटील मौजे बटवाडी बुजरुख तालुके बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे आमचे दुकानचे २८० दोनशे ऐंशी रुपये तुह्माकडे कर्ज निघालें आहे व हे रुपये तुह्मास रुजू असून स्टांप लावून तुह्मी सहीहि करून दिली आहे. व त्याच वेळीं तुह्मी असें कबूल केलें होतें कीं, दोन महिन्यांनीं हे रुपये आदा करूं. तो करार भरल्यानंतर आह्मी तुह्माकडे शिपाई पाठविला त्याजवळ तुह्मी तक्रार करून फिर्याद करा ह्मणून सांगून पाठविले त्यानंतर लागलीच शिरलेकर गोसावी बावा व पाटील यांजबरोबर निरोप पाठविला कीं, फिर्याद करूं नका; आठ दिवसांत सदर्हू रकमेचा स्टांप कागदावर पुर्जा करून देईन असे ह्मणाले त्याला ही सुमारें एक महिना होत आला तरी तुह्मी अजून पुर्जा करून देत नाहीं व रुपयेही देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून ८ दिवसांचे आंत सदर्हू रुपये व्याजासुद्धां आदा करून द्यावे. न दिल्यास फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासुद्धा व कोर्टीचे खर्चासुद्धां सर्व रुपये वसूल केले जातील कळावें तारीख १६ माहे जुलै सन १८८० इसवी.

( सही ) शिवाजी इंद्राजी वहिवाटदार
मेताजी शिवाजी पाटिल
दस्तुर खुद

---

नोटिस-

गंगा ज्यान्हवी मातुश्री लक्ष्मीबाई जवजे त्रिंबकराव नारायण वस्ती मौजे जनुनें तालुके खामगाव जिल्हे अकोलें नोटिस देणार रावजी त्रिंबक पाटील मौजे जनूनें हल्लीं वस्ती बाळापुर शिरसाष्टांग नमस्कार विनंती विशेष नोटिसीनें कळवितो कीं त्रिंबकराव नारायण माझा बाप याचे नावचीं शेतें सर्वे नंबर एक पासून बारा नंबरचीं खाते अजमास १२१ एकशे एकवीस रुपयांचें असून शिवाय जिनगी आणखी पुष्कळ आहे आणि मी अज्ञान असून मला तुह्मी घरांतून काढून दिलें आणि जिनगीची वाताहत करून शेतें लोकांस विकणें सुरू केलें आहे त्यास सदर्हू मयताचा मी वारस पुत्र आहे त्यास मी फिर्याद करणार आहे जर कोणी त्रिंबकराव नारायण यांचीं शेतें लक्ष्मीबाई विकील आणि कोणी घेईल तर त्याचा पैसा व्यर्थ जाईल आणि घेतलेला माल मिळणार नाहीं या शिवाय सदरील व या पूर्वींही कोणी शेतें घेतलीं असतील तर तींही घेतलीं जातील सबब कोणी घेऊ नये. कळावें तारीख ११ माहे जुलै सन १८८० इसवी.

( सही ) रावजी त्रिंबक पाटील जनुनें
पालन करणार भगवंत व्यंकटेश
रहाणार बाळापुर
दस्तुर खुद.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें. [illegible] ई क.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख २६ माहे जुलै सन १८८० इसवी. अंक २९


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| **डाक हाशील.** | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRI-BUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentlemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

NOTICE.

Notice is hereby given to the public within the limits of the Akola Municipality under section 7 of act VI of 1873 that it is the intention of the Akola Municipal Committee to levy a tax as detailed below which shall be styled a Conservancy Cess. Any inhabitant residing within the Municipal limits is required to submit in writing to the Municipal Office his or her objection or objections if any within a fortnight from date of publication.

*Conservancy Cess,*

*Rule* 1 On every owner of a house the estimated annual rental of which is.

Rs. 12 or under......8 Anas per annum.
Rs. 12 to 25...... R. 1 per annum
,, 25 to 50......Rs 2 per annum
,, 50 to 100......,, 3 ,,
Above Rs. 100 ,, 3 per cent.

Provided [1] that no single assessment under this head exceed Rs. 6; and further provided [2) that so long as his house remains untenanted the owner shall only pay one quarter the assessment.

11 For every private latrine swept by the Municipality.

Class 1 (latrines cleaned twice a day)
Adults 2 annas per mensem
Children 1 anna per mensem
Class 11 ( latrine cleaned once a day.)
Each person ½ anna per mensem
( Signed ) J. FitzGerald
President
Akola Municipality.

सन १८७३ इसवीचा आक्ट नंबर ४ यांतील कलम ७ प्रमाणें अकोलें म्युनिसिप्यालिटीचे हद्दींत रहाणारे सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं खालीं लिहिलेले दरवारी प्रमाणें "कान्सर्व्हन्सी सेस" ह्मणजे शहर सफाईबद्दल कर बसविण्याचा अकोले म्युनिसिपाल कमेटीचा इरादा आहे. सदहू कर बसविण्याबद्दल सदहू कमेटीचे हद्दींत रहाणारे कोणा इसमाची कांहीं हरकत असल्यास त्यांनीं ही नोटिस छापून प्रसिद्ध झाल्या तारखेपासून १५ दिवसांचे आंत लेखी अर्ज म्युनिसिप्यालिटीचे आफिसांत दाखल करावा.

कान्सर्व्हन्सी सेस.

नियम १ ला. ज्या घराचे भाड्याचें उत्पन्न सालीना खालीं लिहिल्याप्रमाणें असेल असे घराचे मालकावर कर बसेल तो येणें प्रमाणें:——

| | | | |
|---|---|---|---|
| १२ रुपये किंवा त्याहून कमी भाड्याचे घराचे मालकावर दरसाल आणे | | | ०८ |
| १२ पासून २५ रुपये | ,, | रु० | १ |
| २५ पासून ५० रुपये | ,, | ,, | २ |
| ५० पासून १०० रुपये | ,, | ,, | ३ |
| १०० रुपयावंर दरसाल दर शेकडा | ,, | | २ |

परंतु असें ठरविलें आहे कीं एका इसमावर या प्रकारचा कर सहा रुपयांहून जास्त बसवू नये व जितके दिवस घर रिकामें राहील तितके दिवसांबद्दल चौथाई कर वसूल केला जाईल.

नियम २ खानगी पायखाने जे मुनिसिपाल कमेटीकडून सफा केले जातात त्यांचे दोन वर्ग आहेत

वर्ग १. जे पायखाने दिवसांतून दोन वेळ सफा केले जातात ते. मोठे मनुष्यास दरमहा दोन आणे व मुलास एक आणा,

वर्ग २ जे पायखाने दिवसांतून एकदा सफा केले जातात ते. प्रत्येक मनुष्यास दरमहा अर्धा आणा.

ता. जुलै १८८०

( Signed ) J. FitzGerald.
प्रेसिडेंट अकोलें म्युनिसिप्यालिटी.

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकुर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

## बटु हरिदास.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० खाली लिहिल्या चार ओळी आपल्या येत्या अंकांत छापून प्रसिद्ध करण्याची मेहेरबानी व्हावी.

" गुणाः पूज्यास्थानं
गुणिषु नच लिंगं नच वयः

मुक्काम इलिचपुर ता० १३
माहे जुलै १८८० इसवी.

महाराज, एथें एक नवीन हरदास आले आहेत. हे कैलासवासी आबा बुवा गद्रे नाशिककर यांचे पुत्र होत. यांस "बटु" हें विशेषण लावण्याचें कारण हे वयानें अगदी अल्प ह्मणजे तेरा वर्षांचे आहेत. यांस गोविंद बुवा असें ह्मणतात. हें बाप असतांनां कीर्तनसमयीं त्यांचे पाठीमागें उभे रहात असत. वयाचे संबंधानें पहातां यांची कीर्तनें करण्याची शैली वर्णनीय आहे. आख्यानाचा विषय प्रतिपादन करण्याची हतोटी चांगली आहे. मधेंमधें संस्कृत श्लोक, आर्या, पदें दिंड्या वगैरे योग्य स्थळीं ह्मणून क्वचित स्थळीं तर संस्कृत श्लोकांचा पदविग्रह व स्पष्टीकरण संस्कृतातच करितात. भाषणही अस्खलित आहे. बुवाचे आचरणही वयानुरूप नसतां चांगलें प्रौढ व भारदस्तपणाचें आहे, असें दिसून येतें. वरील सर्व गुण हे वयाचे मानानें पहातां खरोखर आश्चर्यकारक होत असें मला वाटतें. नाटकांतील कांहीं कांहीं मुलें दोन दोन तास अखंडित भाषण करितात. परंतु ती गोष्टच निराळी; कारण त्यांचे भाषणविषय एकव्यक्तीय असून शिवाय त्यांनां प्रत्यक्ष प्रेक्षक मंडळीला उद्देशून बोलण्याचें नसते, व यावरून पहातां त्यांचा सभाधीटपणा वाखाणण्या जोगा आहे. विषयप्रतिपादनाप्रमाणें अभिनही चांगला असतो. कीर्तनाला श्रोतृमंडळी ३०० ४०० असते. व त्या सर्वांनां ऐकूं जावेंसें भाषण करितांनां बुवाला आपला बराच कंठशोष करावा लागतो. हे बोलतांना मात्र थोडी त्वरा करितात यास्तव भाषण थोडें स्थीरतेनें झाल्यास बरें दिसून त्या योगानें यांनां परिश्रमही कमी होतील असें मला वाटतें. बुवा हे घरून कांहीं कथा करण्याचे उद्देशानें निघाले नसून त्यांचे चुलते परतवाडा एथील शाळेंत असिस्टंट मास्तर आहेत त्यास भेटण्याकरितां आले होते व एथेंच त्यांनीं कथा करण्याचा उपक्रम केला आहे. यावरून पहातां इतक्या अल्प काळांत असा वर्णनीय गुण संपादन केल्याचें सर्वांनां परमाश्चर्य वाटत आहे. यांच्या परतवाड्यास ८।९ कथा झाल्या असून हल्लीं ते शहरांत आले आहेत. एथेंही पांच सहा कथा होऊन रोज माळ सुरूच आहे. शहरांत हल्लीं सर्वतोमुखी बुवांचा गुणानुवाद ऐकूं येतो बटु हरीदासाचे संबंधानें हें पाहिलेंच उदाहरण होय. यांस उत्तम शास्त्रीय शिक्षण असल्यास हे उत्तरोत्तर फारच प्रख्यातीस येऊन आपल्या कीर्तन मालेंत सर्वत्र अग्रगण्य होतील अशी माझी पूर्ण खात्री आहे. परमेश्वरानें या मुलास दीर्घायुषी करावें हीच प्रार्थना आहे. कळावें लोभ असावा ही विज्ञप्ती.

एक शहरवासी श्रोता.

बडोदें ता. १६ जुलै १८८०.

रा. रा. ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—

हवामान—हल्लीं दोन तीन दिवसांपासून पाऊस राहून राहून पण पुष्कळ पडतो, व तेणेंकरून शेतास फार आहे अशी शेतकरी लोकांची हाकाहाक झाली आहे. मेघराज काय दया करतील ती खरी; नाहीं तर हाही ओला काळ होईल कीं काय अशी धास्ती लोकांस पडली आहे. कांहीं ठिकाणीं शेतांत पाणी भरलें असल्यानें अद्याप पेरण्या झाल्या नाहींत. हवा फार सर्द होऊन गावांत ज्वराचा आजार बराच सुरू झाला आहे. सालगुदस्तांही या शहरावर ज्वर महाराजांची कृपा होतीच व त्यांच्या तडाक्यांत सापडून व्याकूळ झालेले हजारों लोक शेवटीं मृत्यूच्या सदनास गेले, व सालमजकुरींही तोच प्रकार दिसतो आहे. ईश्वर काय दया करील ती खरी. नाहींपेक्षां हें शहर वसती सुटून लहान होण्याचा समय दिसतो. सरासरी लोकांवर एक ना एक संकट नेहेमीं असतेंच. सालगुदस्तांपासून या शहरावर महामारी बाईनें कृपा केली तो तिचा बदला ज्वर महाराजांनीं फेडला; मिळून एकच.

मि० कृष्णराव गोपाळ देशमुख यांची प्रकृती बिघडली असल्यानें ते रजेवर गेले होते ते परत येऊन त्यांणीं आपली प्रकृति चांगली झाल्याचा नामदार दिवाण साहेब यांजकडे अर्ज केल्यावरून तूर्त त्यांणीं एक्सट्रा जज्ज ह्मणून बडोदे शहरचे न्यायाधीश यांजकडील सेशनच्या कामाचा निकाल करावा असा हुकूम होऊन त्याप्रमाणें ते तारीख १० जुलै सन १८८० पासून काम करूं लागले. आतां पुढें काय होतें तें पहावें.

या बडोदे संस्थानच्या लोकांचें दुर्दैव. नेहेमी एकादि चांगली गोष्ट होणार ह्मणून जी वदंता उठते तो मध्यें आडवें पडतें व आपला अम्मल जारी ठेवितें. अशीच स्थिति कोठपावेतों लोकांचे नशीबीं असेल ती असो. राव बहादूर महादेव गोविंद रानडे या संस्थानांत येणार व त्यांजकडे दिवाण साहेबांचे हुजूर जीं अपिलें होतात त्यांची तजवीज व्हावी अशी वदंता उठून लोक आनंद मानूं लागले न लागले तोंच त्यांस सरकार इकडे पाठवीत नाहीं अशी खबर पसरली, व तेणेंकरून लोकांस जी उमेद आतां आपल्यास योग्य न्याय मिळेल ह्मणून होती तिचा समूळ नाश झाला. या संस्थानांत खालशाप्रमाणें मुनसफ, जज्ज, व हायकोर्टाचे जज्ज अशा नेमणुका झाल्या आहेत, पगारही संस्थानच्या मानानें पुष्कळ आहेत पण न्याय मात्र खालशांतला नाहीं. खालशा[illegible] रीतीप्रमाणें येथें सर्व व्यवस्था जर अ[illegible] तर हा[illegible]कोर्टांतच जज्ज कमी कां? व एका जज्ज हें शेवटलें कोर्ट असल्यामुळें इनसाफ देणें बरोबर नाहीं जाणून तिकडे दोन दोन जज्ज बसून उभयतांचे एक मतानें जो न्याय होण्याची जगमान्य रीत आहे ती नामदार दिवाण साहेब कां सुरू करित नाहींत. याचें कारण कांहीं समजत नाहीं;

एक वृद्ध बाबाशाई क.

वऱ्हाडसमाचार.

मिति आषाढ वद्य ५ शके १८०२

## अफगाण प्रकरण संपलें.

दोन वर्षे चालू असलेलें त्रासकारक अफगाण प्रकरण आतां संपलेंसें दिसतें. हल्लीं इंग्लिश सरकारची फौज जी तेथें राहिलेली आहे ती लढाई निमित्त नसून कोणा एकास तेथें अमीर करून मग परत आणावी अशा बेतावर ठेविलेली होती तेथें कित्येक फळ्या आहेत. त्यांतून मुख्य वारस अबदुल रहमान जो रशिया देशांत दहा वर्षे होता त्यालाच काबुलावर आणून अमिराचे गादीवर स्थापन करावें या उद्देशानें दोन तीन महिने सरकार त्या प्रयत्नांत होते; पण त्याचा बेतच कांहीं कळत नव्हता. तो मोठा शाहणा व कावेबाज असावा असें दिसतें. काबुलांतील सरदार लोकही निमेहून अधिक त्याला अनुकूळ आहेत. इंग्लिश सरकारानें त्याला पत्र पाठवून कळविलें होते कीं कंदाहार व कुरम खोरें शिवाय बाकी देश आह्मी तुमचे स्वाधीन करून तुह्मास अमीर करितो. त्याचा त्यानें स्पष्ट जबाब न देतां काबुलांतील आपले इष्टमित्रांस असें कळविलें कीं कंदाहार वगैरे सुद्धां इंग्लिश सरकार माझे स्वाधीन करून मला अमीर करीत आहेत. त्याप्रमाणें घडल्यास ठीक आहे. नाहींपेक्षां कडेकोट तयारीनें असावें पण मी तुह्मास अखेरचा हुकूम देईपर्यंत तुह्मी ब्रिटिश लोकांवर शस्त्र धरूं नये. अशीं वर्तमानें प्रसिद्ध झाल्यावरून इंग्लिश सरकारास त्याविषयीं संशय वाटला होता. व त्यांनीं पुन्हा त्याला पत्र पाठविलें होतें व त्याचा जबाब काय येतो याची वाट पहात होते शेवटीं अनुकूल जबाब आला असें दिसतें इंग्लिश वर्तमानपत्रांतून स्पष्ट लिहिलें आहे कीं अबदुल रहमान यानें सरकारच्या सर्व अटी कबूल करून काबुलास येण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें तो येण्यास निघाला. पहिली त्याची समजूत झालेली चुकीची होती व ती मी आतां सोडून दिली असें त्यानें कळविलें आहे तेव्हां आतां कांहीं बांधा राहिला नाहीं.

इंग्लिश सरकारची फौज निरर्थक तेथें खर्च खात राहिली होती व ती परत आणण्याचा विचार होता पण कांहीं तरी प्रकारानें तेथील प्रकरण तडीस जाऊं देऊन मग मागें यावें असें सरकारास वाटत होतें. तसें घडून आलें. हा एक नक्षा झाला. आतां तारीख १५ आगष्टाला तेथून फौजा परत यावयास निघणार जनरल सर डोनल्डस स्टीवर्ट साहेब यांनीं आधींपासूनच फौजांचा मोहरा फिरविण्याची सर्व तजवीज केली आहे. याकुबखानाची फळी ह्मणजे महमद जान वगैरे अबदुल रहमानाला शत्रू आहेत व त्यांची त्यांची हमेशा गोळी वाजेल पण आमच्या सरकारी फौजेनें तींत मन घालावें असें आतां कांहीं कारण राहिलें नाहीं. मग तसाच निदानीचा कांहीं प्रसंग आल्यास सांगवत नाहीं.

काबुली लोकांस अबदुल रहमान फारसा प्रिय नाहीं. ह्मणून गादीचे संरक्षणाकरितां बाल्याहिसारवर आणि सिरपुरावर त्याला चांगला सैन्याचा बंदोबस्त करून ठेविला पाहिजे. नाहींपेक्षां कोणे वेळेस काय होईल याचा नेम नाहीं. आमचे इंग्लिश सरकारास ही कंदहार एथें आणि हिंदुस्थानच्या सरहद्दीवर आपली जी फौज ठेवावयाची ती सज्ज ठेविली पाहिजे ह्मणजे झालें.

---

Our articles iu connection with a contemporary's hankering after notoriety at the expense of veracity and other people's reputation have produced the desired effect and we heartily wish to have nothing more to do with the matter. We have thoroughly exposed the hollowness of the imputations against Rao Bahadoor Narayen Bhai and Major Thompson and we have performed our duty of defending the conduct of the officers who had been grossly defamed.

If the *Urdu Akhbar* had in his recen tarticles given additional information or offered some evidence to support the statements which he had previously published, we should have considered it our duty to notice seriously the articles in its issue of the 24th instant; but we fail to see in it any thing sensible and, as we expected, they are full of choice Billingsgate which the Editor considers equivalent to sound arguments.

The Editor endeavours to prove that his writings are not frivolous &can hardly conceal his self-gratulation at thef act that his effusions have at last been noticed by the *Berar Samachar*!! He has taken pains to convince the public that his writings have disturbed the equanimity of some of his readers and that he is in reality an important personage. He says that we envy his position! As the brilliant Journalistic prosperity of this far famed Editor is well-known and the high character of the distinguished journal has been thoroughly appreciated from the time of Colonel Nemblhard by all the officers of the Province from the commissioner down to the lowest office, his condition cannot but be enviable and we in all humility plead guilty to the charge!

We must also express our gratitude for some 'lessons' in our profession which the Editor has condescended to vouchsafe to us. These may be summarised and illustrated for the edification of our readers.

In the first place defame every body, especially one against whom you owe a private grudge. This is in reality honest criticism. If any one brings forward arguments to defend him you are to call him a flatterer. These are then the two words in the Editorial vocabulary which you must not forget:— To criticize shall mean to accuse falsely and to flatter shall mean to state the truth.

Continue to state and persist in falsehoods as long as you are sure that you are not offending against the Press Act and the Penal Code. Moreover you ought to be prepared to encounter these even. Conduct your paper in such a way that you shall have to lose nothing in the shape of character or position if all the rigours of these Acts be at any time used against yonr Journal.

Be thoroughly original in your facts and composition. Describe the full and elaborate details of a meeting which has never been held and of a tragedy which has never occurred. If you were to report a speech really delivered by the Resident or Commissioner, that would be gross plagiarism and abject flattery. You must always use your powers of invention.

An illustration of *honest criticism* would here be useful. Say for instance that A a Government servant has received illegal gratification from B through C. If the vulgar people call this a slanderous and foul libel, say in your paper that you are in a position to prove it. If it is contradicted by A, withdraw it in your next issue; but take care to add that it was the "popular rumour.' In your third issue, however, you must use your logical powers and endeavour to prove that your assertion was true. The arguments are these:--*Only* three persons A. B. & C. are likely to know whether the statement is true or false, and the Editor can have no proof. *Therefore* the statement is true. Q. E. D.!! you must keep in your heart one expression in the Editorial vocabulary: *Popular rumour* shall mean the original and choice productions of the imagination of an Editor who always endeavours to abstain from committing the ignoble crime of speaking the truth !!!

Always misquote Government orders and circulars. If any body finds fault with what you have done, say boldly that you fully understand the orders and that your opponent does not. If the words of the orders are plain and the meaning unmistakable, and the order is actually quoted by any body, say something to the following effect; —"What of that? What do we care for the words of the Order? Government did not mean what they wrote; and we have peculiar means of penetrating into the inmost depths of the mind of the authorities and what we say is true." It must be remembered that in the famous vacabulary, *Interpret* means *Substitute* such words as would answer the purpose of *Critism* which as has been previously said, signifys *false accusation*.

We need hardly say that we shall lay all these valuable lessons to heart!!

---

The working of the Indian Railways during the half year ending 31st December 1879 has resulted in a net profit of 241 lacs of Rs. The E. I. R. Main and Jubbulpur lines effecting earnings to the extent of 133 lacs. The G. I. P. R. net earnings aggregating 27 lacs. The Khamgaon and Amraoti Railways suffering a loss of 7 and 4 thousand Rupees respectively. The Nizam's a saving of Rs. 53 thousand.

The loss in the Khamgaon and Amraoti lines of railway is apparent. The Khamgaon line is 7½ miles long, the Amraoti line 5½ miles. The establishment neccessary for these smallest of the Indian Railways must naturally be costly. The earnings of extensive Railways are greater in proportion to the length of line. The E. I. R. Main and Jubbulpur lines mean mileage open extend over 15 hundred miles and these have secured the highest earings among the Indian Railways. The length of the G. I. P. is 12 hundred miles (next in size) and has secured the next highest and soon proportionately. It is therefore evident that had our local trains covered a larger area, the loss sustained will have been avoided. A question of importance to be considered in extending these Railways is in what direction, and with what utility. If these two questions are unanswerable there is no remedy. The Amraoti line may with advantage be extended to Ellichpur, This would lengthen the line some 30 miles more. The summer resort and Berar sanitarium [Chickulda] will be easily accesible. A military outpost will be within reach of easy communication and the revival of trade will be asscured. At present made roads and pads sparsely interspersed in Berar do not render it an emporium as it ought to be, and the gradual development of Railways will soon bring out the large resources it undoubtedly possesses. A line from Akola Via Basim and Koowlass will be eminently successful The difficulties in regard to finances being only temporary. For as soon as the line is in full working order it will repay itself as all other lines have done. It will give us great pleasure to find that the local government has given its consideration to establishing lines of Railway in Berar for the development of trade as well as for the remaining attendant benefits accruing there from we shall then have done with our miserable jag trot tonga dawks, and uncouth country hacks producing clouds of dust an opthalmic blur in the progress of civilization.

The gauge question has already frequently been discussed in In-

dian journals and the broad gauge has invariably carried logic on its side, simply on account of the vast net worn of Indian Railways being constructed on that principle. The metre gauge will certainly not answer for Berar. It will result in a dead block at either of the terminus station.

---

It has been decided that in future official news shall be communicated to the Press through the secretary and in his absence the Under Secretary or assistant secretary to the Government of Bengal. No such intelligence is however to be sent prematurely for publication, We hope this initiative will induce local Governments to follow the example. It would be very inconvenient to wait for Berar news to be sent through the Resident's office and we would certainly prefer Departmental heads being permitted to communicated directly with us. While the Secretary for Berar may be allowed to furnish intelligencies of a political nature pertaining to Hyderabad.

---

A plant growing wild over milliodns of acres in Mexico, has been found to yield strong silky fibres, some of them 16 feet long. Specimens sent to England were there woven into Handkerchiefs, strong and extremely beautiful, appearing more like silver tissue than like linen. The persistent and praisworthy efforts of Major Cousmaker of Poona celebrity to raise a supply of cocoons sufficient to render it plentiful for purposes of manufacture may with propriety be deviated to this source of industry which in a short time promisdes to equal the best silk ever manufactured in England.

---

It is in contemplation to extend the prison accommodation in Lockups in Districts so as to fit them for the location of prisoners whose terms of imprisonment does not exceed one year and to draft all long term prisoners thence to the Amraoti Jail converting the Akola Jail — into a District Jail and the Amraoti Jail into a Central Jail. The scheme will involve immense expenditure and therefore the financial stability will have to be consulted before taking the initiative in this measure. Instead of demolishing the Amraoti Jail and reconstructing another to adapt it for the uses of a central Jail perhaps the expenditure may be lessened by converting the present Jail into a Lunatic Asylum by slight alterations and the money intended for the construction of a New Lunatic Asylum transferred, to the credit of the Jail fund. On the score of economy the appointments of Superintendent and Jailor are to be combined in one person in the central Jail at Amraoti. It is not clear what arrangements will be made at the Akola Jail, when it is degraded to the class of a District Jail.

---

## वऱ्हाड.

तीन आठवडे पर्जन्य नसल्यामुळे अकोल्याच्या लोकांची स्थिति फार साशंक झाली आहे. परमेश्वर काय करणार तें कळत नाहीं. कांहीं ठिकाणीं झालेल्या पेरण्या खराब झाल्या व बाकी ठिकाणीं झाल्या नाहींत मिळून बहुतेक जमिनी काळ्याच्या काळ्या ह्मणावयास योग्य अशा आहेत. मेघराजानें फार लवकर कृपा केली नाहीं तर प्रसंग फार कठीण आहे. गावांत ज्वर वगैरेचा आजारही बराच वाढला आहे.

---

डा० लिटल साहेब स्यानिटरी कमिशनर तारीख २१ रोजीं घोड्यावर बसून शिकारीस निघाले असतां त्यांचा कुतरा घोड्याच्या पुढच्या पायांत शिरला तेणेंकरून घोडा बावरून खालीं पडला व त्या बरोबर साहेब पडले. घोड्याचा तर प्राण गेला व साहेबाचे डावे हाताचें मनगटाचें हाड उखळलें व शीर तुटली. पण डा० धूप साहेब यांनी तावडतोब हाड बसविल्यावरून व शिरेस उपाय केल्यावरून भीति मानण्यासारखें कांहीं राहिलें नाहीं. परमेश्वरानें मोठी खैर केली.

---

मे० ग्रांट साहेब इन्स्पेक्टर जनरल यांची स्वारी उमरावतीस परत गेली.

---

रा. रा. बाळकृष्ण अप्पा मुदालियार पब्लिक वर्क्स खात्याकडील डिपुटी एकझामिनर यांची स्वारी वऱ्हाडांत तपासणी करितां हैदराबादेहून या आठवड्यांत एथें आली. हल्लीं. अकोल्याची तपासणी होऊन ते वाशिमास गेले आहेत. तिकडून येऊन उमरावतीस जाऊन परत जातील. मुदालियार हे एथें नऊ वर्षांमागें अकौंटंट होते व त्यांच्या सुस्वभावाकरितां सर्व मंडळी त्यांस च्याहत होती. त्यांच्या यांच्या भेटी होऊन सर्वांस संतोष झाला.

---

जबलपुराकडील एका तरुण स्त्रीस कांहीं कोल्हाटिणींनीं भुलथाप देऊन मारण्याच्या उद्देशें इकडे आणिली होती. हल्लीं हें प्रकरण उघडीस आलें आहे व त्या कोल्हाटणी पळून गेल्या आहेत. मे० फिटझरल्ड साहेब यांनीं रा. रा. रामराव कृष्ण चीफ कानस्टेबल यांस तपासा करितां जबलपुरास पाठविलें आहे.

---

जुडिशियल कमिशनर साहेबाची स्वारी सेशनाकरितां उमरावतीस गेली होती ती परत आली. मूर्तिजापुरचे शास्त्री यांचे सुनेवर तुनाचा अपराध शाबीद होऊन तिला फाशीची शिक्षा झाली. या स्त्रीचें वय २१ वर्षांचें आहे. हिनें आपले जबानींत सांगितलें कीं, मी तीन वेळ असा विषप्रयोगाचा प्रकार केला, तेव्हां शेवटचे वेळीं ही सिद्धी झाली. तेथील नायब तहाशिलदार रा. रा. सिताराम माणकेश्वर जे हल्लीं खामगावास आहेत त्यांवर मी आसक्त असून वारंवार त्यांकडे जात असे त्याकरितां घरची मंडळी बरी पहात नव्हती तो जाच काढून टाकावा ह्मणून मुद्दाम मी ही तजवीज केली!

---

दुसरे मुकद्दम्यांत तिवसें एथील ७ आरोपी होते व त्यांवर खुनाचीच तोहमत होती पण ती शाबीद झाली नाहीं ह्मणून त्यांस सोडून दिलें.

---

एथील मिडलक्लास स्कुलावरील हेडमास्तर रा. रा. पांडुरंग दामोदर दवणकर अजून रजेवरच आहेत व ते आजारी असून त्यांचा परत येण्याचा नेम नाहीं. सबब रा. रा. लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर बी. ए. हल्लींचे अक्टिंग हेडमास्तर यांस त्या जागेचा भरपगार देण्याचा डायरेक्टर साहेबानीं ठराव केला आहे. व बहुधा तेंच कायम हेडमास्तर होऊन दवणकर ग्राचुइटी किंवा पेनशन घेतील असें दिसतें.

---

रा. रा. नारायण रावजी बुलढाण्याचे डेपुटी कमिशनर कचेरींतील कारकून यांनीं बनाऊ दस्तैवज केल्याच्या आरोपाची रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण भट ए० असिस्टंट कमिशनर यांजपुढें चौकशी होऊन त्यांनीं वरच्या कोर्टाकडे मुकद्दमा पाठविला असें कळतें.

---

रा. रा. केशव लक्ष्मण जोरवेकर वणीचे स्कूलमास्तर जे रजेवर होते त्यानीं ग्राचुइटी मिळण्याविषयीं अर्ज केला होता व त्याप्रमाणें त्यांनां सुमार ७०० रु० मिळाले असते परंतु डाक्टरानीं सर्टिफिकीट दिल्यांत ते बहुत काल वाचणार नाहींत असें लिहिल्यावरून ग्राचुइटी न मिळतां दरमहा ९ रु० पेनशन मिळावे असा ठराव झाला.

---

रा. रा. गबूशींग जमादार अकोटचे आनररी माजिस्त्रेट व रा. रा. मोतीराम शेट एथें आले होते त्यांनीं काल एथील धर्मशाळेला अनुक्रमें १०० व ५० रुपये दिले हें ऐकून आह्मांस संतोष वाटतो.

---

आगगाडीच्या वेळांत लवकरच फेरफार होणार आहे. वऱ्हाडांतून प्यासेंजर गाडी रात्रीची आहे ती दिवसाची होणार. व तिची वेळ सुमार दोन तास अलीकडे येऊन मुंबईस मेल ट्रेन हल्लीं पेक्षां ३ तास आधी पोंचणार असें ह्मणतात.

---

नाना भाई नाटकवाले यास इंदुराकडे धरण्यासाठीं वारंट गेलें आहे त्याला ते सापडले किंवा नाहीं तें समजलें नाहीं पण त्यांची पारू सापडली व तिला घेऊन गेले मुंबईच्या पोलिसानें हुशारी करून बहुतेक सर्व ह्मणजे सुमार १९००० रुपयांच्या डागिण्याचा पत्ता लाविला. बाळजी यांनींही यांतील कित्येक डागिने गहाण टाकले व त्यांचें स्वरूप पालटलें असें समजलें आहे.

---

वणी जिल्ह्यांत दिगरस गावाला पोलिस आक्टाचें ३४ वें कलम लागू केलें.

---

मि० जे क्रेग साहेब एथील एक्सिक्युटीव इंजिनियर थर्ड ग्रेड होते ते सेकंड झाले. त्यांचप्रमाणें क्या० कानिंगहाम थर्ड ग्रेडचे सेकंड ग्रेड झाले. व क्या० फाक्स फोर्थ ग्रेडचे थर्ड ग्रेड झाले. व सेकंड ग्रेड असिस्टंट इंजिनियर मि० लिसली, मि० वाट्स, व मि० कूड हे फर्स्ट ग्रेड असिस्टंट इंजिनियर झाले.

---

रा. रा. बापुजी रंगनाथ वाशिमचे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस लवकरच पेनशन घ्यावें लागेल असें उर्दू अखबारांत लिहिलेलें आहे त्याविषयीं तेथील एक मित्र ह्मणतात कीं "ही गोष्ट एथें आह्मांस ठाऊक नसून खुद्द बापु साहेब यांस आह्मी विचारिली तर त्यांनांही तीविषयीं कांहीं ठाऊक नाहीं असें ते ह्मणाले."

---

मेजर ए फ्यारर यांची रजा आणखी ४ महिने स्टेट सेक्रेटरी यानीं वाढविली असें रेसिडेन्सीआर्डरवरून समजतें.

---

सुपरन्यु मररी सेकंड क्लास आसिस्टंट असिस्टंट शेक सुब्राती यांस २ महिन्यांची रजा मिळाली व पहिली रजा रद्द केली.

---

मि. प्रन्हेस्ट फारेस्टकडील सेकंड ग्रेड असिस्टंट कानसर्वेटर यांस फर्स्ट ग्रेड केलें.

---

उमरावती जिल्ह्यांतील चांदूर तालुक्यांत नांदगाव काजी एथें रा. रा. गंगाधर गजानन जहागिरदार यांस रूरल सब रजिष्ट्रार नेमिलें.

---

इलिचपुर— पर्जन्य या आठवड्यांत बिलकूल नाहीं व कालपासून आकाश अभ्रांनीं आच्छादीत आहे परंतु पडत नाहीं मग मेघराजांच्या मनांत काय असेल ते असो. बाजार भाव आहे तोच आहे. रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं. व. मि.

---

उमरावती— पर्जन्यानें बहुतेक डोळे उघडल्यासारखें दिसतें सायंकाळीं कधीं कधीं चोहोंकडून अभ्रें जमून येऊन थोडीशी वृष्टी होते. पावसाची हल्लीं फार जरूरी आहे. रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं.

एथील मु० कमेटीकडील कंदील कोणी फोडले व पायखान्याचे तट्टे नेले याबद्दल कोणी तपास लावून देईल त्यास ५० रु० बक्षीस मिळेल असें कमेटीनें ठरविलें आहे.

---

## वर्तमानसार.

मद्रासच्या शेतकीच्या कालेजांत शिकून तयार झालेले मि० फाटक नावाचे पारशी गृहस्थास होळकर सरकारांनीं आपलेकडे सुधारणा करण्यासाठीं ठेवून घेतलें आहे असें समजतें.

अमदाबादेस ७ वे तारखेस मुसळधारा पाऊस पडला.

काबुलाहून ११७ तोफा व कांहीं नजर कैदी अलाहाबादेस आणिले.

एका युरोपियन क्लबनें २५० रुपयावर एक युरोपियन चिटणीस ठेवावयाचा आहे असें जाहिर केलें तर ८० युरोपियन लोकांचे अर्ज झाले !

मि० क्यांडी साहेब नगरचे असिस्टंट कलेक्टर जे एथें कांहीं दिवस डायरेक्टर होते त्यांची नाशकास कलेक्टरच्या जागेवर नेमणूक झाली आहे.

ठाण्याचे वकील रा. रा. रामचंद्र त्रिंबक आचार्य यांस राव बहादूरचा किताब देण्याविषयीं सरकारचा ठराव झाल्याप्रमाणें गेल्या आठवड्यांत सभा भरून तो किताब जडज साहेबांनीं त्यांस दिला.

महाबलेश्वर नावाचें गलबत लंडनाहून लश्करी सामान भरून हिंदुस्थानांत येत असतां वाटेंत फुटलें.

ब्रह्म देशाहून विलायतची डाक घेऊन निघालेली एक आगबोट कोठें चुकली आहे तिचा पत्ता नाहीं.

रंपा एथील बंड आतां लवकर मोडेल असें ह्मणतात

देशांतील जुन्या इमारतींचें संरक्षणाकरितां क्या० कोल साहेब रायल इंजिनियर यांची हिंदुस्थान सरकारानें नेमणूक केली आहे.

रेल्वे संबंधी माहितीची पत्रकें नवीन तऱ्हेचीं करण्याकरितां सिमल्यास एक कमिटी नेमिली आहे.

काबुलाकडे पाडकाव एथें लढाई झाली तेव्हां शत्रूपक्षांत कांहीं स्त्रियाही होत्या असें समजलें आहे.

लंडन शहरांत अति रूपवान एक स्त्री आहे तिचे मनांत आलें आहे कीं, नाटकाचे रंगभूमीवर जाऊन उत्तम भाषणानें आपण विख्यात व्हावें.

सिंध प्रांतांतून व मुंबईकडून कांहीं फौज काबुलाकडे रवाना झाली आहे.

इंदुराकडे चांगला पाऊस पडला. जवळपुराकडेही पुष्कळ पाऊस पडत आहे.

सर फ्रांक सूटर साहेब मुंबईचे पोलिस कमिशनर रजेवर गेले होते ते परत आले.

भडोचकडे पुष्कळ पाऊस पडला तेणें करून कित्येक घरें व दुकानें पडलीं.

सर मंगळदास नथूभाई नाइट सी. एस. आय. यांणीं ज्ञातीसंबंधांत पुष्कळ खटपट केली ह्मणून त्यांस मानपत्र देण्यासाठीं तज्जातीय कमेटी मुकर झाली आहे.

सातार्‍याजवळ माहुली एथें नदींतून अर्ध्या पाण्यांत नाव गेल्यावर कडेवरचे खांब उपटून पडले. सुमार ७५ मनुष्यें आंत होतीं तीं सर्व मरावयाचीं पण कोळी लोकांनीं फार हुशारी करून त्यांनां कडेस नेऊन लाविलें.

रा. ब. माधवराव वासुदेव बर्वे कोलापुरचे कारभारी यांनीं नवीन ज्योतिष शाळेस ४५ रुपये दिले.

काशीकडे या आठवड्यांत पाऊस फार चांगला पडला असें तिकडील पत्रावरून समजतें.

मुंबईचे गवरनर साहेब पुण्यास शहर पहाण्यास गेले होते. एक दिवस हिराबागेंत प्रदर्शन पहावयास गेले होते. हायस्कुलांत गेले होते. व गायन समाजाची कांहीं मंडळीही त्यांनीं आपले बंगल्यावर नेटिव गायन व वाद्य कला ऐकण्यासाठीं बोलाविली होती.

सुरतेचे नबाब सयद अलमखान यांनीं मुसलमान लोकांच्या विद्याभ्यासाकरितां मुंबईच्या मंडळीस २००० रुपये दिले.

सातार जिल्ह्यांतील वाईच्या लोकांनीं नवीन अधिक पोलिस कर आपणावर बसविलेला माफ करावा अशी नवीन गवरनर साहेबांस अर्जी केली होती ती नामंजुर झाली.

काबुलाकडे हिंदुस्थानांतून धान्य पुष्कळ जाऊं लागलें आहे

अमदाबादचे कालेजांतील विद्यार्थ्यांनीं संस्कृतांत शाकुंतल नाटकाचा प्रयोग केला.

न्यूपोर्ट एथें कोळशाच्या खाणींत सुरुंग उडून ११९ मनुष्यें प्राणास मुकलीं.

चीनचा प्रधान इंग्लंडाहून रशियाकडे गेला.

पंटरपुरीं आषाढीची यात्रा सवा लाख जमली होती.

काबुलच्या आसपासचे किल्ले पाडण्याचें काम जारीनें सुरू आहे.

हिंदुस्थानांत कंपनी सरकारचें राज्य असतांनां ६१ कोटि रुपये हिंदुस्थानास कर्ज होतें व अलीकडे २१ वर्षें बादशाही राज्य झाल्यानें तें कर्ज वाढून १४० कोटि रुपये झालें आहे. कंपनीच्या कारकीर्दींत २१ वर्षांत ५३६ कोटि रुपये रयतेपासून करबदल घेतले. व या २१ वर्षांत १०२० कोटि रुपये घेतले. कंपनीच्या वेळीं विलायेतस वार्षिक खर्चाची रकम ५ कोटि रुपये जात होती आतां १६ कोटि रुपये जाते इत्यादि कारणांवरून बादशाही कारकीर्द द्रव्यदृष्टीनें हिंदुस्थानास हितावह नाहीं असें मि. मेकंजी साहेब कंपनीचे एक डायरेक्टर यांनीं प्रसिद्ध केलें आहे. आरंभीं यांचें मत असें होतें कीं, बादशाही कारकीर्दीपासून हिंदुस्थानास फायदा होईल

अन्यायाचें निरसन एकोप्यावांचून होणें नाहीं. फ्रान्स देशाच्या अमलांतील मुलुख पांडेचरी एथील एतद्देशीय लष्करी लोकांचा पगार कमी करून पेनशन मिळण्याबद्दलच्या नोकरीचा काळ वाढविला त्यामुळें लोकांत असंतोष उत्पन्न होऊन त्यांनीं या अन्यायाबद्दल गव्हरनरास अर्ज लिहून तो सहा मुख्य लोकांच्या हातीं देऊन गव्हर्नराकडे पाठविला. गवरनरानें त्या असामीस चाकरींतून बडतर्फ केलें. हे पाहून दुसऱ्या ५० असामींनीं उघड बंड केलें आणि आपले जवळचें सर्व सरकारी सामान सरकारच्या हवालीं करून चाकरी करावयाची नाहीं असें साफ सांगितलें. तेव्हां गव्हरनरानें त्यांचें ह्मणणें मान्द करून त्यांचीं दुःखें फ्रेंच सरकारच्या नजरेस आणून देण्याचें वचन दिलें आहे. ने. ओ.

नानासाहेब पेशवा— गेल्या हिंदु पंचांत लिहिलें आहे कीं, सत्तावन सालांत प्रसिद्धीस आलेला नानासाहेब तेव्हांच नष्ट झाला तो पंचाहत्तर सालीं ग्वाल्हेरीस उपस्थित होऊन खोटा ठरला. तो आतां कल्याणास उत्पन्न परंतु खोटाच ठरला. कल्याण येथील धर्मशाळेत नानासाहेब आहे अशी एका मराठ्यानें पो. इ. स वर्दी दिली व त्यानें त्यास पकडला. वर्दी देणारास ठाण्यास आणलें. तो सांगतो कीं, नगर जिल्ह्यांत भिलाना येथें ५८ सालीं मी नानास पाहिलें होतें व तोच हा आहे. या शिवाय आणखी ही बरीच हकीकत त्यानें कळविली- त्यावरून खऱ्या नानासाहेबाच्या चेहेरेपट्टीशीं याचा चेहरा ताडून पहातां हा तो नव्हे असें ठरलें व नानासाहेब ह्मणून पकडलेला इसम असें सांगत आहे कीं, मी सावतवाडी कडील राहाणारा असून मराठा आहे इतके दिवस नाटकांत होतों, हल्लीं बैरागी झालों आहे. याच्या डोकीवर जटा असून, दाढी सफेत झाली आहे अंगानें सदृढ आहे. या बनावट नानास ५०० रुपयांचा हजर जामीन घेऊन सोडून देण्यांत आल्याचें कळतें. वर्दी देणारा सांगत असलेल्या हकीकतीची माहिती मिळविण्या करितां त्यास मुंबईस पो. कामिशनरकडे रवाना केलें आहे. ज्ञा. च.

धुळें— या आठवड्यांत पर्जन्य साधारण बरा झाला. यामुळें पेरण्याचीं वगैरे कामें सपाट्यानें सुरू झालीं आहेत. याप्रमाणें बहुतेक तालुक्यांत अबादानी झाल्याची वार्ता ऐकण्यांत येते. परंतु अद्यापपावेतो पावसाची पुष्कळ जरूर आहे आतां तरी वेळेवर पडत गेल्यास पुष्कळ काम होण्यासारखें आहे.

सर बार्टल फ्रियर यांस केप एथील गवर्नरच्या कामावरून काढावें असा विलायत सरकारानें ठराव केल्याचें ऐकून दक्षिण आफ्रिकेंतील वजनदार व्यापारी लोकांनीं लार्ड किंबलें यांस भेटून असें सांगितलें कीं, फ्रियर साहेबांसारखा उत्तम गवर्नर आजवर आमच्या देशावर आला नव्हता; त्यांस सरकारानें काढलें असतां तेथील राजेरजवाड्यांचें ऐक्य करण्याचा जो सरकारचा हेतु आहे तो सिद्धीस जाणार नाहीं. यास्तव त्यांस कामावर राहूं द्यावें. ज्ञा द.

आफगाणिस्थानांत जीं इंजिनियर संबंधाचीं अनेक कामें झालीं त्यांत एकट्या काबुलच्या नदीस पूल बांधण्यांत २,११००० रुपये खर्च झाला. यावरून एकंदर काबुलच्या लढाईंत २० कोट रुपये खर्च लागला यांत नवल काय?

बंगाल्यांतील एका तुरुंगांत ११५० कैदी असून त्यांपैकीं १००० कैदी तुरुंगांतील छापखान्याच्या कामावर असतात असे सागतात. इतके लोक छापखान्याच्या कामावर काय करीत असतील!

गेल्या शनवारीं पुणें एथील जुन्या गायन समाजांतील मंडळीस व गवई लोकांस आपल्या बंगल्यांत नेण्याकरितां ने० ना० गव्हरनर साहेब यांणीं ७ गाड्या पाठविल्या होत्या. त्याप्रमाणें गवई लोक व बडेबडे १६ गृहस्थ गेले होते. तेथें गेल्यावर वाद्य व गाण्याचा समारंभ होऊन नंतर पान सुपारी वगैरे वाटून समारंभ आटपला. ने० ना० गव्हरनर साहेब खुष झाल्याबद्दल रा० ब० शंकर पांडुरंग पंडित यांणीं बोलून दाखविलें. पु० वै०

## लक्ष्मीसरस्वतीचरित्र.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक. शा. विक्री.

पादाक्रांत समस्त होउनि रिपू
ते खंडणी फारशी ।
देती ब्रह्मि चिनी सयामि अवघे
ते काबुली फारशी ॥
ऐसे रोमकपत्तनावरि महा
भूपाळही जिंकिल ।
दांतीं ते धरिती तृणा समुळही
धैर्यें जयां टाकिलें ॥ २० ॥

मदिरा ( सवाई. )

गाउं किती तरि बाउच मानुनि
बालकसे अति भीति धरीती ।
ठाउक ज्यांस न बाण शरासन
ते रथिं आसन केवि धरीती ॥
सिंधुस जो करि बिंदु तयापरि
हिंदु तया अरिलागि अभासे ॥
नामचि केवळ ऐकुनियां पळ
घेति भरून इजाराहि खासे ॥ ११ ॥
मीपण सोडुनियां कर जोडुनि
संगरिं जे अरि पाठिं रिघाले ।
त्यां बहु रक्षित अन्य रिपु क्षिति
माजि उठे तरि वारु निघाले ॥
देति तयां बहु मान समानचि
मानुनिया करभार न घेती ।
कोण सुजाण ह्मणेल नृपास
अगा हितकारक रीत न घे ती ॥२२॥

साकया.

धीर वीर परि संगरि जे अरि,
दुर्भाग्यें जित झाले ।
करभारा घेउनि आभारा,
बंध-मुक्त ते केले ॥ २३ ॥
पाळें मुळें खणावयाची,
इच्छा नाहिं उदेली ॥
क्षमा दया शांतिनें जनमनें,
तुष्टि पुष्टितें नेली ॥ २४ ॥

स्वागता.

अंतरीं कटु वरी अमृताचा ।
गर्व हारिल अशी मधु वाचा ॥
मीं भक्षि बक तापसवेषें ।
हा अलीकडिल रीति विशेषें ॥ २५ ॥
आर्य आर्यचि खरे सुविचारी ।
केवि तन्मति वळेल विचारी ॥
निंद्य घोर अति नीच कराया ।
कर्म रौरवपुरीस भराया ॥ २६ ॥

कामदा.

जिंकिल्या जनां तृप्ति देउनी ।
राज्य रक्षिलें चित्त वेधुनी ॥
सिद्धिते जशी स्थीर जाहली ।
कोणत्या गुणें होय ते हलीं ॥ २७ ॥

मालिनी.

आशि सकळ सुखाची जाहली रेलचेल ।
वरिवरि बहु खातां अन्न कां हो पचेल ॥
तदुपरि गत झाली अब्द जातां अनेक ।
उदधिवेधिसुता त्या भांडल्या एकमेक २८

( पुढें चालू. )

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.